१०३ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, सोमवार ८ डिसेंबर, २०२५ • वर्ष-५, अंक-८०, पाने-८, किंमत : ₹ ६
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 80, Marathi - Daily - Pune, 8 December, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
गोव्यातील नाईट क्लबला लागली आग!
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## कबुतरांना भूतदया दाखवेल तोच पालिका निवडणूक जिंकणार

### जैनमुनी निलेशचंद्रांचा पुन्हा इशारा

■ मुंबई



**दादर कबुतरखाना बंद करण्याच्या मुंबई महापालिकेच्या निर्णयाने जैन समाज आज पुन्हा आक्रमक झाला. जैन धर्मातील जीवदया तत्त्वानुसार कबुतरांना दाणा-पाणी देण्यास परवानगी द्यावी, कबुतरांना जो भूतदया दाखवेल तोच मुंबई महापालिका निवडणूक जिंकेल असे म्हणत जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी आज राजकीय पक्षांना इशारा दिला.**

**निलेशचंद्र** विजय म्हणाले की, कबुतरखान्याचा प्रश्न हा जीवदयेशी संबंधित आहे. प्रत्येक इमारतीत जाऊन आम्ही जैन समाजाला संघटित करत आहोत. दादर कबुतरखान्याजवळ आमरण उपोषणाला बसणार आहोत. जे प्राण्यांचा विचार करतात, तेच मुंबई महापालिकेवर राज्य करणार आहेत. आज जैनांचे या विषयावर आंदोलन होणार होते. मात्र आंदोलन न करता त्यांनी घरोघरी प्रचार करणार असल्याची घोषणा केली.

ते पुढे म्हणाले की, सरकारने मागच्या वेळी आमच्या मागण्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. पण त्यावर अजून कोणतीही गंभीर कारवाई झालेली नाही. त्यामुळे जैन समाज संघटित करण्यासाठी अभियान सुरू केले आहे. प्रत्येक इमारतीत प्रवचनमाला आयोजित करून जागृती केली जात आहे. या अभियानाची सुरुवात आज कुलाबा येथून होत आहे. सरकारवर टीका करत ते म्हणाले की, एक लाख कबुतरांचा मृत्यू झाला तरी कोणतीही चौकशी समिती स्थापन केली नाही. सरकारमध्ये खरी जीवदया असती तर दादर कबुतरखान्यावरील ताडपत्री काढली असती. आमची तुलना मौलवी किंवा मौलानांशी करू नये. आम्ही जिहाद, लव्ह जिहाद, लँड जिहाद करत नाही. आम्ही केवळ जैन समाज आणि भारताच्या विकासासाठी काम करतो.

गायसंवर्धन आणि मंदिर सुरक्षा या विषयांवरही त्यांनी चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, कबुतरांमुळे रोगराई पसरते ही अफवा आहे. हा केवळ जैन समाजाचा मुद्दा नाही, तर प्राणीमात्रांच्या कल्याणाचा प्रश्न आहे. महाराष्ट्रात गोमातेला राज्यमाता घोषित केले असतानाही अनेक ठिकाणी गायींची हत्या केली जाते. मालेगावात रोज १५-२० गायी पकडून मारल्या जातात, अशी माहिती आहे. आता कबुतरखाना पाडण्याचा विषय पुढे करण्यात आला असून, न्यायालयाचा आदेश असल्याचे सांगितले जात आहे. जर सरकारने आमच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला नाही तर दादर कबुतरखान्यावर पुन्हा आमरण उपोषण सुरू केले जाईल. आम्ही जैन समाजासाठी नव्हे, तर सर्व प्राणीमित्रांच्या कल्याणासाठी लढत आहोत.

## इंडिगोचा गोंधळ अदानीच्या फायद्यासाठी?
## काँग्रेसचा सरकारवर खळबळजनक आरोप

■ मुंबई




**इंडिगो एअरलाईन्समुळे देशातील विमानतळांवर निर्माण झालेली प्रचंड गोंधळाची स्थिती अजूनही पूर्ण निवळली नसताना काँग्रेसने आज केंद्र सरकारवर गंभीर आरोप केला. अदानी समूहाचा फायदा करण्यासाठी हा गोंधळ जाणीवपूर्वक घडवण्यात आला का? असा सवाल करणारा व्हिडिओ काँग्रेसने पोस्ट केला आहे.**

**काँग्रेसने** या व्हिडिओत म्हटले आहे की, २७ नोव्हेंबर रोजी अदानी समूहाने भारतातील सर्वात मोठी फुल फ्लाईट सिम्युलेटर ट्रेनिंग कंपनी (एफएसटीसी) खरेदी केली. त्याच्यानंतर अगदी तीन दिवसांतच इंडिगोची उड्डाणे मोठ्या प्रमाणावर रद्द होणे, विमाने उशिरा उडणे आणि वैमानिक उपलब्ध नसणे या बातम्यांची देशभरात चर्चा सुरू झाली. त्यामुळे वैमानिक प्रशिक्षण आणि वैमानिक भरती यावर खास लक्ष देण्याची गरज असल्याचे वातावरण तयार झाले. अदानीने जी कंपनी ताब्यात घेतली ती नेमके वैमानिक प्रशिक्षणच करते. त्यामुळे वैमानिकांचा तुटवडा असल्याचे जे वातावरण तयार केले ते अदानीचा फायदा होण्यासाठी जाणीवपूर्वक केलेले नियोजन आहे का? की हा फक्त योगायोग आहे? हा सवाल विचारला आहे.

या व्हिडिओत पुढे म्हटले आहे की यापूर्वी जेव्हा अदानीला कमी गुणवत्तेचा कोळसा महाग विकायचा होता तेव्हा देशभरात केवळ एक-दोन दिवस पुरेल एवढाच कोळसा असल्याच्या बातम्या पसरवण्यात आल्या होत्या. या गोष्टीचा थेट फायदा अदानीला झाला होता. नरेंद्र मोदी आणि अदानी यावेळीही हेच सूत्र वापरत आहेत का? याचे देशाला उत्तर मिळाले पाहिजे.

दरम्यान, गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या इंडिगोचा गोंधळ आजही सुरू राहिला, पण आज हे संकट काहीसे निवळले. आजही जम्मू, अमृतसर, अहमदाबाद, गुवाहाटी, नागपूर आणि ऐझवाल येथून होणारी ४०० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली. मात्र, पुणे, संभाजीनगर आणि मुंबई विमानतळावरून इंडिगोचे उड्डाण आज काही प्रमाणात सुरू झाले. गेल्या काही दिवसांच्या तुलनेत आज देशातील विमानतळांवर गर्दी कमी होती. इंडिगोने असा दावा केला की, आम्ही ९५ टक्के विमान वाहतूक सुरळीत केली आहे. आज आम्ही १३५ ठिकाणांवरून १,५०० उड्डाणे केली.

केंद्रीय नागरी विमान उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आज पुण्यात पत्रकार परिषदेत इंडिगोच्या गोंधळाबद्दल म्हणाले की, फ्लाईट ड्यूटी टाईम लिमिटेशनच्या नियमांची अंमलबजावणी दोन टप्प्यांत करण्यात पान ७ वर

धौती-योग®
चूर्ण व टॅबलेट्स
पोट साफ न होणे, बद्धकोष्ठ, गॅसेस, ॲसिडिटी, मूळव्याध इ. विकारांवर प्रभावी!
आजच रात्री घ्या, सकाळी OK!
9422011723

## मुंबईत पुन्हा गॅस संकट दादर परिसरात पुरवठा ठप्प

**मुंबई** - मुंबईतील अँटॉप हिल परिसरात गॅस पुरवठा २४ तासांपासून बंद असल्याने रहिवाशांची मोठी अडचण झाली. माटुंगा परिसरात बीएमसीकडून रस्त्याचे खोदकाम सुरू असताना महानगर गॅसची पाईपलाईन फुटली. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने दादर, माटुंगा, सायन आणि प्रतीक्षानगर परिसरातील गॅसपुरवठा तत्काळ बंद करण्यात आला. मात्र दुरुस्तीचे काम लांबल्याने पुरवठा पुन्हा सुरू होण्यास उशीर झाला.

## पाप लपवण्यासाठीच विरोधी पक्षनेते पद दिले जात नाही

■ नागपूर

**नागपुरात** उद्यापासून राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

यांच्या सरकारी निवास 'रामगिरी' येथे चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. मात्र, विरोधकांनी यंदाही परंपरेनुसार या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला. आपली पापे लपवण्यासाठी विरोधी पक्षनेतेपद दिले जात नसल्याचा आरोप यावेळी विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर केला.

या अधिवेशनात दोन्ही सभागृहांत विरोधी पक्षनेते नसल्यामुळे रविभवन परिसरातील विरोधकांसाठी राखीव दोन बंगले यावेळी त्यांना देण्यात आले नाहीत. परिणामी विरोधकांना आपली बैठक आणि पत्रकार परिषद काँग्रेस पक्ष कार्यालयात घ्यावी लागली. या बैठकीला काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार, अभिजित वंजारी, अतुल लोंढे तसेच उबाठाचे भास्कर जाधव, सुनील प्रभू व अनिल परब उपस्थित होते. बैठकीनंतर विरोधकांनी संयुक्त पत्रकार परिषद पान ७ वर

## वर्षपूर्तीबद्दल मुख्यमंत्र्यांचे नार्वेकरांकडून अभिनंदन

■ नागपूर

**सरकारच्या** वर्षपूर्तीबद्दल उबाठाचे आमदार आणि उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय मिलिंद नार्वेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आहे. याची चर्चा होत असून, शिंदेंच्या शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी मिलिंद नार्वेकर हे सर्वपक्षीय नेते आहेत, असे वक्तव्य केले.

सरनाईक म्हणाले की, मिलिंद नार्वेकर सगळ्यांचेच अभिनंदन करत असतात. ते मुख्यमंत्र्यांचेही अभिनंदन करतात, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेही अभिनंदन करतात. परिवहन मंत्री म्हणून माझेही अभिनंदन करतात आणि उद्धव ठाकरे साहेबांना मिळालेल्या तिसऱ्या क्रमांकाच्या पसंतीबद्दल त्यांचेही अभिनंदन करतात.

## गोव्याच्या नाईट क्लबमध्ये अग्नितांडव
## २५ जणांचा मृत्यू! चौकशीचे आदेश

■ पणजी

**गोव्यातील** सर्वात लोकप्रिय समुद्रकिनाऱ्यांपैकी एक असलेल्या बागा येथे अर्पोरा गावातील बिर्च बाय रोमिओ

### मालक फरार

लेन या नाईट क्लबमध्ये काल रात्री १२ च्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत किमान २५ जणांचा मृत्यू झाला. तर सात जण जखमी झाले. बळी पडलेल्यांपैकी बहुतेक कर्मचारी आणि पर्यटक असल्याचे पोलिसांनी सांगितले. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी घटनास्थळी



भेट देऊन दंडाधिकारी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्याचबरोबर मृतांच्या नातेवाईकांना २ लाख आणि जखमींना ५० हजारांची मदत जाहीर केली. या क्लबच्या मॅनेजरला पान ७ वर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## सावकाराच्या छळाला कंटाळून अकोल्यात शेतकऱ्याची आत्महत्या

■ अकोला

**डिग्रस** बुद्रुक गावातील गोपाळ पाटखेडे या शेतकऱ्याने खासगी सावकाराकडून होणाऱ्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचा आरोप त्याच्या कुटुंबियांकडून करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांनी आरोप केला आहे की, सावकाराचे १ लाख रुपयांचे कर्ज शेतकऱ्याने व्याजासह फेडूनही खासगी सावकाराकडून त्याची शेतजमीन बळकावण्याची धमकी देण्यात येत होती. सावकाराकडून आणखी ७ ते ८ लाखांची मागणी करणे सुरूच होते. आरोपीने बेलोरा खुर्द येथील ०.४० हेक्टर जमीन जबरदस्तीने त्याच्या नावावर नोंदवली. २६ नोव्हेंबर रोजी त्यांच्या मृत्यूपूर्वी, गोपाळने त्यांच्या मोबाईल फोनवर एक व्हिडिओ रेकॉर्ड केला होता. ज्यामध्ये ते म्हणाले आहेत की, ते मला जगू देत नाहीत. त्यांचा माझ्यावर सतत दबाव आहे. म्हणूनच मी माझे जीवन संपवत आहे.

## नाशिकसाठी स्वत: झाडे खरेदी मंत्री महाजनांचे फोटो व्हायरल



■ नाशिक

**कुंभमेळ्यासाठी** तपोवन परिसरातील १८०० झाडे तोडण्याच्या पालिकेच्या तयारीमुळे नाशिकमध्ये नागरिक आणि पर्यावरणप्रेमींचा संताप वाढला आहे. शासन आता सांगत आहे की, तपोवनातील झाडांना हात लावण्यापूर्वी शहरात तब्बल १५ हजार देशी प्रजातींची झाडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. या वृक्षलागवडीसाठी झाडे थेट आंध्र प्रदेशातील राजमुद्री येथून मागवली जात आहेत. कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी स्वतः राजमुद्रीला जाऊन नर्सरीची पाहणी केली आणि १५ फूट उंचीची लिंब, जांभूळ, आंबा, वड, पिंपळ यांसह १५



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

हजार झाडांची निवड केली. याचे फोटो आता व्हायरल झाल्याने पर्यावरणवादी अधिकच भडकले आहेत. दरम्यान पालिका प्रशासनाने उद्या पर्यावरण कार्यकर्त्यांना चर्चेसाठी बोलावले. खेळ खेळणे, गाणी म्हणणे आदि करीत आज दिवसभर येथे ठिय्या मांडून त्यांनी वृक्षतोड करण्यास विरोध केला.

## पतंजली उत्पादने रशियात मिळणार पुतिन यांच्या दौऱ्याचा फायदा

■ नवी दिल्ली

**रशियाचे** राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्या भारत दौऱ्याच्या दरम्यान दोन्ही देशांत अनेक करार झाले. पुतिन दौऱ्याचा फायदा रामदेवबाबा यांच्या पतंजली उद्योगालाही झाला. पतंजली आणि रशियन सरकार यांच्यात रशियात योगचा प्रसार, पतंजली उत्पादने विक्री आणि कुशल मनुष्यबळ तयार करणे याबाबत करार झाला. त्यामुळे पतंजलीला आता रशियाच्या बाजारात प्रवेश मिळणार असून, पतंजलीच्या उद्योगाचा प्रसार होणार आहे.

नवी दिल्लीतील द लीला पॅलेस हॉटेलमध्ये झालेल्या समारंभात भारत-रशिया

### सामंजस्य करार

व्यवसाय परिषदेचे अध्यक्ष आणि मॉस्को सरकारचे मंत्री सर्गेई चेरेमिन, योगगुरू स्वामी रामदेव यांनी करारावर स्वाक्षरी केली. सर्गेई चेरेमिन हे पुतिन यांच्यासोबत भारत दौऱ्यात होते. या सामंजस्य करारांतर्गत दोन्ही देश संशोधनावर संयुक्तपणे काम करतील.

## लडाखमधील ९२० मीटर लांबीचा श्योक बोगदा देशाला समर्पित

**लडाखमधील ९२० मीटर लांबीचा लडाख कट-अँड-कव्हर श्योक बोगदा संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज राष्ट्राला समर्पित केला. या बोगद्यामुळे भूस्खलन आणि हिमस्खलनाच्या शक्यता असलेल्या भागातही अखंड वाहतूक सुरू ठेवता येईल.**

■ नवी दिल्ली

**संरक्षण** मंत्री राजनाथ सिंह यांनी लडाखमधील ऐतिहासिक श्योक बोगदा येथून सीमा रस्ते संघटनेच्या




१२५ पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन करून राष्ट्राला समर्पित केले. देशाच्या सीमेवरील पायाभूत सुविधा आणि धोरणात्मक तयारीसाठी हे प्रकल्प महत्त्वाचे मानले जातात. या प्रकल्पांमध्ये २८ रस्ते, ९३ पूल आणि ४ इतर धोरणात्मक पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश आहे.

संरक्षणमंत्र्यांनी उद्घाटन केलेले प्रकल्प लडाख आणि जम्मू आणि काश्मीर तसेच अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, पश्चिम बंगाल आणि मिझोरम या राज्यात आहेत. नवीन आणि सुधारित पायाभूत सुविधांमुळे दुर्गम गावे, सीमा चौक्या आणि पुढील लष्करी ठिकाणांपर्यंत पोहोचणे सोपे झाले आहे.

## जळगावात शिंदे आमदाराकडून स्ट्राँग रूमबाहेर खासगी सुरक्षा

■ जळगाव

**राज्यात** २ डिसेंबरला झालेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबरला जाहीर होणार आहे. निकालापर्यंत ईव्हीएम मशीन सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी पोलीस प्रशासनावर आहे. मात्र ईव्हीएममध्ये गडबड होऊ शकते, या भीतीने अनेक उमेदवार आणि कार्यकर्ते स्ट्राँग रूमच्या बाहेर पहारा देत आहेत. जळगावात तर शिंदेसेनेचे आमदार किशोर पाटील यांनी स्ट्राँग रुमबाहेर खासगी सुरक्षा तैनात केली. त्यामुळे जिल्ह्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

जळगावातील भडगाव आणि पाचोरा येथील ईव्हीएम स्ट्राँग रूमबाहेर सुरक्षेसाठी सरकारी सुरक्षा यंत्रणेसह गणवेशधारी खासगी सुरक्षा रक्षक दिसत आहेत. शिंदे गटाचे आ. किशोर पाटील यांनी उमेदवारांच्या आग्रहास्तव खासगी सुरक्षा रक्षक तैनात केले आहे. दोन्ही ठिकाणी नगरपालिका निवडणुकीत शिंदेसेना आणि भाजपा यांच्यात सामना आहे. स्ट्राँग रूमच्या सुरक्षेवरून सगळेच राजकीय पक्ष पान ७ वर

## कर्नाटकच्या नॅशनल हेराल्ड प्रकरणात डीके बंधूंना ईडीने नोटीस पाठवली

■ नवी दिल्ली

**दिल्ली** पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने आणि ईडीने कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार आणि त्यांचे भाऊ डी. के. सुरेश यांना नोटीस पाठवली आहे. त्यामध्ये त्यांना 'यंग इंडियन' या नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राच्या मालकीच्या कंपनीसोबत झालेल्या सर्व आर्थिक व्यवहारांची माहिती देण्यास सांगितले आहे. ईडीने नॅशनल हेराल्ड प्रकरणात दिल्ली पोलिसांकडे नवीन खटला दाखल केल्यानंतर एक आठवड्यानंतर ही नोटीस पाठवण्यात आली आहे.

या नोटीसमध्ये यंग इंडियनला शिवकुमार आणि सुरेश यांनी किंवा त्यांच्या



संबंधित कंपन्यांकडून दिलेल्या रकमेची संपूर्ण सविस्तर माहिती देण्यास सांगितले आहे. पोलिसांनी नोटीसद्वारे विचारणा केली आहे की, यंग इंडियनला बँक हस्तांतरणाद्वारे निधी दिला होता त्यामागील उद्देश काय होता? मेसर्स यंग इंडियनशी संबंधित इतर कोणत्याही व्यक्ती अथवा भागधारकांमध्ये व्यवहार किंवा संवाद झाला होता का? शिवकुमार यांनी यंग इंडियनला दिलेल्या देणग्यांचा स्त्रोत आणि त्यासाठी देणगी प्रमाणपत्रे जारी करण्यात आली होती का? याबद्दल देखील माहिती मागितली आहे. आयटीआरमध्ये संबंधित वेळेत हे बँक हस्तांतरण कसे दाखवण्यात आले? या संदर्भात संबंधित कागदपत्रे द्या असेही नोटीसमध्ये म्हटले आहे.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मोठ्या प्रमाणात हाऊसकीपिंग सिक्युरिटी गार्ड ऑफीसबॉय पाहिजे वसईफाटा, बोरिवली, कांदिवली, पालघर, जोगेश्वरी, वडाळा.- **8097507698** {NC253237}

सर्व सुविधा बोरिवली (वेस्ट) येथील मोठ्या हॉस्पिटलमध्ये मावशी, हाऊसकीपिंग व सुपरवायझरची त्वरीत भरती. वय -40 वर्षे, अंधेरी (वेस्ट). संपर्क- **8879753659 / 8652436999** {NC253283}

लोअरपरेल पगार 18000 (सुट्टी नाही), वेळ 8 ते 5, PF, ॲडव्हान्स, बोनस, ट्रेनपास, बस भाडे, ओव्हर टाईम, इन्सेन्टिव्ह मिळेल, बिल्डिंगवरील टाक्यांची साफसफाई करण्यासाठी गरजू आणि मेहनती युवकांसाठी, वय 40 पर्यंत. **9320080200 / 9821819036** {NC253143}

पाहिजेत बेंच फिटर आणि टर्नर अंधेरी (पूर्व) आणि वसई (पूर्व) दूरध्वनी- **9920331622 / 02226874914** saimplmumbai@gmail.com {NC253279}

डोंबिवली (पूर्व) MIDC मध्ये रेडीमेंट गारमेंन्ट्स फॅक्टरीमध्ये फॉर्मल/पार्टीवेअर शर्ट बनविण्यासाठी कारागीर व हेल्पर आणि गारमेंन्ट्स शर्टचे बॉक्स बनविण्यासाठी महिला/पुरुष पाहिजे संपर्क- **9819830444 / 8369298344** {NC253278}

प्रिंटिंग प्रेससाठी आवश्यक आहे (कल्याण, वेस्ट)- सेंट्रल लाईनला राहाणारे- १) हेडलबर्ग SM ऑफसेट प्रिंटर आणि बॉयलर २) लॅमिनेशन मशीन ऑपरेटर ३) पंचिंग मशीन ऑपरेटर ४) पॅकिंग (लेडीज वय २६ ते ४५ पर्यंत) ५) हेल्पर. फोकस, गाला नंबर सी-१, रवारिया इंडस्ट्रियल इस्टेट, भिवंडी कोण रोड, कल्याण वेस्ट **संपर्क- 7045333202 / 9821434502** {NC253281}

## पाहिजेत

सोसायट्यांच्या ऑफीसमध्ये आमच्या सर्व्हीसेसची मार्केटींगसाठी स्टाफ पाहिजे. चांगला पगार. **9082555428** {NC253254}

हेडलबर्ग SM-74 फोरकलर ऑटोप्लेट ऑफसेट मशीनसाठी बॉयलर आणि फिडरमन पाहिजेत. संपर्क - प्रिंट विजन, अंधेरी (पूर्व), साकीनाका **9820136761** {NC253267}

दादर (प.) रीटेल स्टोरला जवळपास राहणारे वय २०-३० सेल्सगर्ल पाहिजे. ड्युटी ११-८.३०. फोन **9324305421**. {NC253261}

**पाहिजेत**
भिवंडी मध्ये मुले पाहिजेत
**मशीन ऑपरेटर (६ nos.)**
**हेल्पर (६ nos.)**
**शिक्षण १०वी ते १२वी**
**वय १८ ते ४५ वर्ष**
पगार : ₹ १६०००/- ते ₹ १८०००/- प्रति महिना.
**संपर्क :**
**ठाकोर इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड**
बिल्डींग न. पी १, पी २, श्री राजलक्ष्मी हायटेक टेक्सटाईल पार्क, नासिक बाय पास रोड, सोनाळे विलेज, भिवंडी - ४२१३०२.
**मो. ९६६५५४६४६२ / ८१०४५००९४९.**

मुलुंड येथील 'नक्षत्र जेम्स' दुकानात काम करण्यासाठी मुली/महिला पाहिजेत. जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य. संपर्क **9869242255/ 02265092921** {NC253272}

पाहिजेत दुकानामध्ये (माहिम-पश्चिम) पॅकींग/ क्लिनिंगसाठी महिला/मुलगी **9920086498/ 8291192348** {NC253316}

## पाहिजेत

मालाडमधील प्रिन्टींग प्रेससाठी अनुभवी डीटीपी ऑपरेटर गुजराती, मराठी, हिंदी टाईपिंग व डिझाईनिंगचे अनुभव पाहिजे व हेल्पर कम डिलीव्हरी बॉईज पाहिजे. **9892106609** {NC253294}

कांदिवली (वेस्ट) नामांकित सुई धागा कंपनीमध्ये पीस काऊंटिंग तसेच किरकोळ कामासाठी हुशार मुली पाहिजेत. (वय 20-30). संपर्कः **8976542593/ 9930737445** {NC253299}

फॅब्रिकेशन मध्ये दरवाजे, शटर, गेट, ग्रील, रूफ, बनवणारे. कॉन्ट्रॅक्टर. कारागीर, हेल्पर पाहिजेत. **9324804795** {NC253314}

पेस्ट कंट्रोल कामासाठी बोरिवली/ वसई ऑफिस टेक्निशियन/ सेल्ससाठी मुले/मुली पाहिजे. **9867801212** {NC253132}

ठाण्यातील प्रा.लि. कंपनीला विविध पदांसाठी दहावी, बारावी, पदवीधर पास/नापास ३० मुले/मुली कायमस्वरूपी पाहिजेत. (फ्रेशर्सना प्राधान्य) प्लेसमेंट नाही. पगार 15000-45000/- **7021534944/ 9819778053** {NC253226}

मरोळ, अंधेरी येथे डिलिव्हरी आणि ऑफिस कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्कः **9892934566** {NC253256}

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (24,000-75,000) **9820628009/ 9833470199** {NC253224}

बँकेच्या रिकव्हरीसाठी मुले (Field Executives) त्वरीत पाहीजेत. संपर्क : विजय - **9930443090**. {NC253320}

वाशी, नवी-मुंबई येथे लेडीज ऑफीस असिं., टेलीकॉलर पाहिजेत. फ्रेशर/ अनुभवी- **9326583110** {NC253321}

मुली - हाउसकीपिंग, रिसेप्शनिष्ठ, सिक्युरिटी, पॅकिंग. 103, निर्मलाधाम, प्रभातनगर, गांवदेवी मैदान, ठाणे वेस्ट **7304179292** {NC253225}

## पाहिजेत

मुंबईत घरकाम, कूक, मुलांची काळजी, रुग्णसेवा, यासाठी मुली/महिला पाहिजे. मोफत राहणे-खाणेची व्यवस्था, पूर्णवेळ/अर्धवेळ, चांगला पगार. **9819339480** {NC253233}

PLANTS WORLD नर्सरीसाठी माळी पाहिजेत चर्नीरोड **9920297466/ 9022094909** {NC253255}

२ वर्षाच्या बाळाला घरी सांभाळण्यासाठी मुलगी/बाई पाहिजे ग्रँटरोड **9867755709** {NC253312}

डायरेक्ट भरती NGO मध्ये सर्वेसाठी १०० मुले मुली पाहिजे दहावी ते पदवी ट्रेनिंग मध्ये २५०००/- नंतर ५०,०००/-राहणे प्रवास फ्री नो सेल. पनवेल **8291717196** {NC253319}

## Situation Vacant

Req Outdoor Clerk, B.K. Mehta- Dhanur Bldg, 1st Floor, P.M. Road, Fort, Mumbai- 400001. # **9819321410.** {NC253239}

Wanted Lift Supervisor, Security Guards. Experience 2-5 years. Area colaba Attractive Salary with all benefits. Contact No. **9920265246/ 9769733808** {NC253284}

## व्यवसायविषयक

सुवर्णसंधी! स्वतःचा व्यवसाय करून दिवसा ३०००/- कमविण्याची. अनिरुद्धा ग्रुप दादर- **8652643434 / 9076403434** {NC253268}


घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30-35 हजार कमवा दोन वर्षाचे अग्रीमेंट - **9028160157** {NC253323}

## व्यसनमुक्ती

दारू, तंबाखू, सिगारेट सोडवा. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व्यसनमुक्ती केंद्र - (दादर) - **7738770405** {NCC250080}




दुनिया जिसे कहते है', 'होश वालों को खबर क्या', 'चुप तुम रहो, चुप हम रहें' यासारख्या अनेक लोकप्रिय गझल लिहिणारे मुक्तिदा हसन निदा फाजली उर्फ निदा फाजला यांचा जन्म एका काश्मिरी कुटुंबात, दिल्ली येथे झाला. शिक्षण ग्वाल्हेर येथे झाले. १९५८ साली त्यांनी ग्वाल्हेर कॉलेजमधून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. निदा फाजली यांचे वडीलही उर्दू शायर होते. लहान वयातच फाजली यांनी लिखाणाला सुरुवात केली.



# विख्यात उर्दू शायर
# निदा फाजली

संजीव वेलणकर, पुणे

एकदा ते एका मंदिरासमोरून जात असताना एक व्यक्ती सूरदासाचे भजन म्हणताना त्यांनी ऐकले. त्या पदाच्या सौंदर्यामुळे प्रभावित झालेल्या निदा यांनी कविता लिहिण्यास सुरुवात केली. मात्र उर्दू कवितांमधे फारसा वाव नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी मीर व गालिब यांना आत्मसात केले आणि स्वत:च्या भावना नेमक्या शब्दांत मांडू लागले.

नोकरीच्या शोधात १९६४ साली ते मुंबईत आले. सुरुवातीच्या काळात त्यांनी धर्मयुग आणि ब्लीट्स मासिकांसाठीही लेखन केले. त्यांच्या लिखाणाच्या शैलीमुळे हिंदी व उर्दूतील अनेक साहित्यिक तसेच चित्रपट दिग्दर्शक प्रभावित झाले. विख्यात चित्रपट निर्माते व दिग्दर्शक कमाल अमरोही यांच्या 'रझिया-सुलतान' चित्रपटासाठी गीते लिहिणारे जान निसार अख्तर यांचे अकस्मात निधन झाले. त्यानंतर अमरोही यांनी फाजली यांच्याकडे विचारणा केली असता चित्रपटातील दोन गाणी लिहून दिली व अशाप्रकारे त्यांनी चित्रपट गीतांसाठी लेखन करण्यास आरंभ केला. त्यानंतर त्यांनी अनेक गीते तसेच गझल लिहिल्या.

प्रसिद्ध टी.व्ही. मालिका 'सैलाब'चे तसेच 'जाने क्या बात हुई' आणि 'ज्योती' यांचे शीर्षकगीतही त्यांच्याच लेखणीतून उतरले. त्यांच्या यादगार गझला आणि शायरींची यादी लांबलचक आहे. परंतु 'कभी किसी को मुकम्मल जहां नहीं मिलता,' 'होशवालों को खबर क्या, बेखुदी क्या चीज है.... ' आणि 'तू इस तरह से मेरी जिंदगी में शामिल है' या जीवनातील क्लिष्टता सहजसाध्या तऱ्हेने मांडणाऱ्या या गझला निदा फाजलींच्याच. निदा फाजली यांच्या बहुतांश गझलांना जगजित सिंह यांनीच आवाज दिला.

१९९४ साली त्यांनी प्रसिद्ध गजलगायक जगजित सिंग यांच्यासोबत काढलेला अल्बम 'इनसाईट' मधील कविता आणि संगीत खूप नावाजले गेले. फाजली यांना १९९८ साली 'साहित्य अकादमी पुरस्कार'ने गौरवण्यात आले. तर 'सूर' या चित्रपटातील गीतलेखनासाठी २००३ साली त्यांनी 'उत्कृष्ट गीतकारा'चा पुरस्कार देण्यात आला. २०१३ साली भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने गौरवले. निदा फाजली यांचे ८ फेब्रुवारी २०१६ रोजी निधन झाले.



# नायगाव उड्डाणपुलावरून दुचाकी कोसळली! दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू

■ वसई

**नायगाव** उड्डाणपुलावरून भरधाव वेगाने जाणाऱ्या दुचाकीचा अपघात झाला. दुचाकी पुलाच्या कठड्याला धडक देत थेट खाली पडली. या अपघातात दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला तर मागे बसलेला मित्र गंभीर जखमी झाला. रविवारी पहाटे हा अपघात घडला.

रोहीत सिंग (२०) आणि त्याचा मित्र विघ्नेश कटकिरवा (१९) हे दोघे मुंबईहून नायगाव पश्चिमेच्या उमेळा येथे जाण्यासाठी दुचाकीवरून निघाले होते. रविवारी पहाटे साडेचारच्या सुमारास ते नायगाव उड्डाणपुलावरून जात असताना दुचाकीचे नियंत्रण सुटले आणि दुचाकी उड्डाणपुलाच्या डाव्या बाजूच्या सिमेंटच्या कठड्याला धडक देऊन थेट खाली पडली. या अपघातात दुचाकी चालक रोहित सिंग याचा जागीच मृत्यू झाला तर मागे बसलेला विघ्नेश किटकरवा गंभीर जखमी झाला. त्याच्यावर वसईच्या कार्डिनल ग्रेशस रुग्णालयात उपचार सुरू आहे. या प्रकरणी माणिकपूर पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे.

# मुंबईत आज आणि उद्या पुन्हा १५ टक्के पाणीकपात

■ मुंबई

**महापालिकेने** भांडुप जलशुद्धीकरण केंद्राला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीला बदलण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे आज सोमवार आणि उद्या मंगळवारी पालिकेच्या १७ प्रशासकीय विभागांमध्ये १५ टक्के पाणीपुरवठ्यात कपात लागू राहणार आहे.

तानसा धरणातून भांडुप जलशुद्धीकरण केंद्रास पाणीपुरवठा करणाऱ्या २७५० मिलीमीटर व्यासाची तानसा जलवाहिनी बदलण्यात येणार आहे. त्यासाठी साधारणतः २४ तासांचा कालावधी आवश्यक आहे. या कामासाठी ८ आणि ९ डिसेंबर या दोन दिवशी १५ टक्के पाणीकपात होणार आहे.

# आजचे राशी भविष्य



सोमवार दि. ८ डिसेंबर २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | कामामध्ये प्रगती करण्यासाठी अधिक परिश्रम घ्याल. घरातील वातावरण आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करावा. प्रवास करताना खबरदारी घ्यावी. |
| वृषभ | कामामध्ये सतत गुंतून राहाल. आर्थिक निर्णय विचारपूर्वक घ्यावा. सहकाऱ्यांची साथ चांगली लाभेल. |
| मिथुन | व्यवसायामध्ये आर्थिक लाभ चांगले होतील. वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद लाभतील. जोडीदाराबरोबर मतभेद टाळा. |
| कर्क | व्यावसायिक ताण जाणवू शकतो. प्रेमविवाहास उत्सुक मंडळींना अनुकूल दिवस राहील. नोकरीत वर्चस्व राहील. |
| सिंह | सरकारी कामांमध्ये दिरंगाई होऊ शकते. एखाद्या आध्यात्मिक स्थळी भेट देण्याचा योग येईल. नोकरीनिमित्त प्रवास घडू शकतो. |
| कन्या | नोकरीमध्ये नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. व्यवसायामध्ये नवीन ओळखीचा फायदा होईल. अडचणी दूर होतील. |
| तूळ | नोकरीत अनुकूल वातावरण राहील. तुम्ही केलेल्या कामाची प्रशंसा होईल. घरामध्ये एखाद्या धार्मिक कार्याचे आयोजन कराल. |
| वृश्चिक | कार्यक्षेत्रात नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. अचानक प्रवासाचा योग येईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. |
| धनु | कामाचा ताण जाणवेल. त्यामुळे चिडचिड वाढेल. नोकरीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. आरोग्याच्या तक्रारी उद्भवू शकतात. |
| मकर | जोडीदार तुमच्या म्हणण्याप्रमाणे वागेल. व्यवसायामध्ये प्रगती होईल. मित्रांच्या गाठीभेटी यशस्वी होतील. |
| कुंभ | नोकरीमध्ये नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. सामाजिक क्षेत्रात नवीन आव्हाने पेलण्यास सक्षम राहाल. |
| मीन | आर्थिक गुंतवणूक करताना खबरदारी घ्यावी. घरात एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन कराल. नोकरीनिमित्त प्रवास घडेल. |

# नाताळ-नववर्षासाठी विशेष रेल्वेगाड्या

■ मुंबई

**डिसेंबर** महिन्यात नाताळची सुट्टी आणि नवीन वर्ष सेलिब्रेशनची योजना आखणाऱ्या प्रवाशांना रेल्वेकडून मोठा दिलासा मिळाला. कोकण, गोवा, कर्नाटक आणि केरळमध्ये मोठ्या प्रमाणात वाढणारी पर्यटन गर्दी आणि रेल्वे तिकिटांची टंचाई लक्षात घेऊन, मध्य रेल्वेने एसी, स्लिपर आणि जनरल अशा २२ डब्यांच्या विशेष गाड्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. डिसेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत या विशेष गाड्या धावणार आहेत.

सीएसएमटी- करमाळी ही गाडी १९ डिसेंबर ते ५ जानेवारीदरम्यान दररोज धावणार आहे. मध्यरात्री सुटणारी ही गाडी दुसऱ्या दिवशी दुपारी करमाळीला पोहोचेल. लोकमान्य टिळक टर्मिनल-तिरुवनंतपूरम ही साप्ताहिक विशेष गाडी १८ व २५ डिसेंबर तसेच १ व ८ जानेवारीला धावेल.


**वाचकांना सूचना**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**


# जुन्नरमध्ये कुत्र्यांनी घेतला ५० जणांचा चावा

■ नारायणगाव

**जुन्नर** शहरात गेल्या काही महिन्यांपासून मोकाट कुत्र्यांनी धुमाकूळ घातला असून, आतापर्यंत या कुत्र्यांनी ५० हून अधिक नागरिकांचा चावा घेतला आहे. यातील काहींनी शासकीय रुग्णालयात, तर काहींनी खासगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले आहेत. यामुळे नागरिकांना मानसिक व आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. जुन्नर नगरपरिषदेने या मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

जुन्नर शहरातील मध्य भागात असणाऱ्या कल्याण पेठेच्या परिसरात लहान मुले व नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या ठिकाणापासून हाकेच्या अंतरावर अनेक शाळा असल्याने शालेय विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील सामाजिक कार्यकर्ते मधुकर काजळे व विनायक गोसावी यांनी या विषयावर आवाज उठवत नगरपालिका प्रशासनाला धारेवर धरले.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 07/12/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-04 : 1459**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0120 | 0587 | 0838 | 1008 | 2620 | 4119 | 9076 | 9217 | 9273 | 9626 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2227 | 3659 | 5212 | 5725 | 6502 | 6686 | 7506 | 8504 | 8911 | 9414 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2844 | 4075 | 4298 | 4905 | 6234 | 8492 | 9183 | 9530 | 9852 | 9919 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1341 | 4284 | 5561 | 5948 | 7172 | 7201 | 8977 | 9650 | 9761 | 9794 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1341 | 2192 | 3017 | 3561 | 4145 | 5052 | 6163 | 7146 | 8058 | 9060 |
| | | 1361 | 2235 | 3041 | 3596 | 4181 | 5055 | 6278 | 7154 | 8070 | 9147 |
| 0039 | 0594 | 1378 | 2236 | 3110 | 3603 | 4331 | 5082 | 6288 | 7274 | 8261 | 9150 |
| 0040 | 0707 | 1414 | 2252 | 3181 | 3604 | 4402 | 5092 | 6355 | 7278 | 8271 | 9189 |
| 0043 | 0787 | 1423 | 2256 | 3223 | 3717 | 4410 | 5099 | 6534 | 7357 | 8318 | 9257 |
| 0076 | 0821 | 1516 | 2275 | 3236 | 3820 | 4446 | 5113 | 6544 | 7439 | 8359 | 9259 |
| 0096 | 0861 | 1518 | 2290 | 3308 | 3823 | 4448 | 5252 | 6572 | 7474 | 8419 | 9332 |
| 0107 | 0910 | 1544 | 2327 | 3317 | 3830 | 4509 | 5340 | 6592 | 7499 | 8497 | 9468 |
| 0236 | 0931 | 1647 | 2372 | 3365 | 3831 | 4533 | 5429 | 6631 | 7502 | 8587 | 9582 |
| 0261 | 1015 | 1726 | 2382 | 3369 | 3838 | 4545 | 5436 | 6696 | 7576 | 8638 | 9624 |
| 0289 | 1025 | 1737 | 2400 | 3370 | 3839 | 4549 | 5473 | 6709 | 7588 | 8644 | 9641 |
| 0300 | 1026 | 1761 | 2422 | 3377 | 3872 | 4557 | 5518 | 6774 | 7602 | 8705 | 9699 |
| 0301 | 1105 | 1776 | 2598 | 3435 | 3983 | 4636 | 5567 | 6783 | 7626 | 8755 | 9774 |
| 0310 | 1166 | 1781 | 2700 | 3497 | 3993 | 4766 | 5584 | 6785 | 7673 | 8760 | 9819 |
| 0326 | 1169 | 1822 | 2762 | 3510 | 4010 | 4768 | 5599 | 6845 | 7674 | 8788 | 9861 |
| 0357 | 1171 | 2034 | 2801 | 3513 | 4044 | 4770 | 5627 | 6861 | 7706 | 8813 | 9922 |
| 0380 | 1172 | 2036 | 2904 | 3519 | 4051 | 4840 | 5654 | 6876 | 7737 | 8852 | 9934 |
| 0420 | 1173 | 2051 | 2928 | 3523 | 4072 | 4845 | 5655 | 6916 | 7770 | 8897 | 9938 |
| 0444 | 1212 | 2107 | 2929 | 3527 | 4074 | 4846 | 5789 | 6963 | 7967 | 8935 | 9942 |
| 0468 | 1216 | 2131 | 2990 | 3534 | 4084 | 4945 | 5820 | 6979 | 7973 | 8938 | 9969 |
| 0570 | 1265 | 2142 | 3001 | 3536 | 4110 | 4972 | 5933 | 7067 | 7998 | 9039 | 9971 |
| 0586 | 1301 | 2152 | 3013 | 3559 | 4135 | 5034 | 6076 | 7092 | 8042 | 9053 | 9981 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 07/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MO-09 : 2014**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0067 | 0458 | 1205 | 1963 | 3065 | 3402 | 4991 | 5239 | 5728 | 7585 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2031 | 2985 | 3114 | 4020 | 4380 | 4951 | 5226 | 6806 | 7062 | 8270 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0519 | 0594 | 1439 | 4114 | 4511 | 5806 | 6620 | 8953 | 9141 | 9710 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1211 | 1858 | 2829 | 4662 | 5523 | 7097 | 8123 | 8975 |
| | 1222 | 1914 | 2840 | 4710 | 5558 | 7102 | 8154 | 8998 |
| 0057 | 1291 | 2132 | 3233 | 4774 | 5615 | 7179 | 8178 | 9137 |
| 0068 | 1298 | 2154 | 3246 | 4892 | 5852 | 7407 | 8224 | 9189 |
| 0074 | 1360 | 2239 | 3276 | 4894 | 5981 | 7428 | 8328 | 9351 |
| 0079 | 1410 | 2293 | 3297 | 5052 | 6079 | 7483 | 8334 | 9543 |
| 0097 | 1414 | 2312 | 3471 | 5127 | 6369 | 7513 | 8374 | 9565 |
| 0103 | 1421 | 2382 | 3840 | 5183 | 6373 | 7673 | 8403 | 9723 |
| 0496 | 1613 | 2458 | 4375 | 5195 | 6443 | 7707 | 8518 | 9751 |
| 0995 | 1614 | 2530 | 4416 | 5275 | 6487 | 7775 | 8529 | 9768 |
| 1093 | 1657 | 2572 | 4434 | 5416 | 6636 | 8002 | 8795 | 9888 |
| 1112 | 1693 | 2620 | 4459 | 5423 | 6663 | 8081 | 8929 | 9954 |
| 1143 | 1799 | 2748 | 4478 | 5454 | 7066 | 8118 | 8952 | 9978 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 07/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-07 : 9344**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **4058**

तिसरे बक्षिस रु. 2000/- : **7044**

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0834 | 1218 | 1556 | 3023 | 4390 | 4910 | 5214 | 5326 | 5535 | 7186 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0733 | 1568 | 3273 | 3641 | 4290 | 4928 | 6547 | 8753 | 9447 | 9918 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0485 | 3171 | 3431 | 4237 | 5998 | 7454 | 8134 | 8946 | 9570 | 9671 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1551 | 2725 | 4083 | 4747 | 5581 | 6243 | 7380 | 8151 | 9147 |
| | | 1630 | 2892 | 4099 | 4774 | 5590 | 6276 | 7457 | 8238 | 9152 |
| | | 1636 | 2983 | 4123 | 4845 | 5648 | 6296 | 7467 | 8425 | 9162 |
| 0010 | 0569 | 1752 | 3010 | 4192 | 5009 | 5700 | 6359 | 7487 | 8428 | 9191 |
| 0029 | 0571 | 1764 | 3084 | 4242 | 5054 | 5713 | 6378 | 7494 | 8453 | 9196 |
| 0049 | 0604 | 1815 | 3145 | 4245 | 5067 | 5750 | 6470 | 7605 | 8469 | 9277 |
| 0070 | 0670 | 1851 | 3232 | 4289 | 5170 | 5753 | 6488 | 7647 | 8478 | 9361 |
| 0093 | 0700 | 1867 | 3269 | 4317 | 5208 | 5754 | 6544 | 7654 | 8527 | 9386 |
| 0108 | 0752 | 2080 | 3305 | 4361 | 5218 | 5790 | 6565 | 7662 | 8547 | 9393 |
| 0120 | 0871 | 2087 | 3307 | 4396 | 5257 | 5808 | 6567 | 7677 | 8606 | 9409 |
| 0146 | 0917 | 2100 | 3313 | 4401 | 5263 | 5826 | 6631 | 7743 | 8617 | 9479 |
| 0196 | 1103 | 2164 | 3330 | 4404 | 5267 | 5850 | 6788 | 7752 | 8643 | 9624 |
| 0242 | 1122 | 2176 | 3340 | 4406 | 5270 | 5857 | 6816 | 7793 | 8664 | 9633 |
| 0290 | 1125 | 2190 | 3375 | 4420 | 5315 | 5899 | 6844 | 7829 | 8689 | 9679 |
| 0320 | 1171 | 2203 | 3404 | 4423 | 5336 | 5910 | 6937 | 7839 | 8782 | 9752 |
| 0360 | 1201 | 2217 | 3411 | 4424 | 5435 | 6031 | 7122 | 7957 | 8858 | 9793 |
| 0405 | 1251 | 2224 | 3464 | 4500 | 5505 | 6052 | 7149 | 8018 | 8931 | 9794 |
| 0445 | 1261 | 2228 | 3625 | 4514 | 5520 | 6058 | 7151 | 8020 | 8979 | 9914 |
| 0471 | 1296 | 2294 | 3831 | 4574 | 5535 | 6129 | 7229 | 8033 | 8998 | 9919 |
| 0505 | 1349 | 2489 | 3955 | 4577 | 5540 | 6161 | 7266 | 8048 | 9050 | 9940 |
| 0520 | 1368 | 2581 | 4079 | 4700 | 5566 | 6166 | 7364 | 8082 | 9131 | 9990 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. ०८/१२/२०२५

| | | |
|---|---|---|
| ७ | ३ | ८ |
| ७१ | ३१ | ८१ |
| ७६ | ३६ | ६६ |
| १२४ | १२० | १७० |
| ३६८ | ४९० | ५६७ |

# वाकोला ब्रीज पालिका शाळेची इमारत उद्घाटनानंतरही बंदच

■ मुंबई

**वाकोला** ब्रीज येथील महापालिका शाळेची पाच मजली इमारत उद्घाटनानंतरही गेल्या तीन वर्षांपासून बंद अवस्थेत आहे, असे धक्कादायक वास्तव्य समोर आले आहे.

या जागेवर पन्नास वर्षे जुनी शाळा होती. या शाळेच्या इमारतीचा काही भाग कोसळला होता. त्यामुळे प्रशासनाने लाखो रुपये खर्चून याच जागी पाच मजली शाळेची नवीन इमारत बांधली आहे. या शाळेच्या भिंतीवर सोनेरी अक्षरात लिहिलेली पाटी लावण्यात आली आहे. यावर ५ डिसेंबर २०२२ रोजी शाळेच्या इमारतीचा उद्घाटन सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याच्या हस्ते संपन्न झाला. यावर राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांचेही नाव झळकताना दिसत आहे. असे असताना सध्या दोन्ही मंत्री तत्कालीन झाले आहेत. मात्र आजपर्यंत शाळेची इमारत सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खुली झालेली नाही. शाळा खुली का झाली नाही, असा सवाल प्रशासनाला विचारण्याची हिंमत राजकीय मंडळींना का होत नाही? असा प्रश्न स्थानिक विचारत आहेत.

# अभिजित थरवळांचा भाजपाप्रवेश स्थगित

**डोंबिवली -** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटातून भाजपामध्ये प्रवेश केलेल्या अभिजित थरवळ यांचा प्रवेश भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी स्थगित केला. चव्हाण यांनी हा निर्णय एक्सवर जाहीर केला आहे.

यापूर्वी कल्याण-डोंबिवलीत ठाकरे गटाचे दीपेश म्हात्रे यांनी भाजपामध्ये प्रवेश केला होता, तर भाजपाच्या दोन नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केला होता. शिवसेना शिंदे गटाने अंबरनाथमधील एका भाजपा महिला पदाधिकाऱ्यालाही पक्षात घेतले होते. ३ डिसेंबर रोजी डोंबिवलीत विकास देसले आणि अभिजित थरवळ यांना भाजपात प्रवेश देण्यात आला. या प्रवेशावरून दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी एकमेकांच्या विरोधात जोरदार आरोप केले होते. त्यानंतर काल डोंबिवलीत सावळाराम क्रीडा संकुल आणि सावत्रीबाई फुले नाट्यगृहाच्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि रवींद्र चव्हाण एकत्र दिसले होते.

## भारतातील अनोखे शहर! २१ वेळा बदलले नाव

■ कानपूर

**भारतातील** अनेक शहरांची जुनी नावे बदलून त्यांची नवी नावे ठेवण्यात आली आहेत. मात्र, उत्तर प्रदेशातील कानपूर शहराचे नाव आतापर्यंत तब्बल २१ वेळा बदलले आहे. कानपूर शहर त्याची संस्कृती, शैली आणि पाककृतीसाठी प्रसिद्ध आहे. कानपूरचे मूळ नाव कान्हापूर होते. त्याची स्थापना हिंदू सिंह चंदेल यांनी केली होती. त्यानंतर या शहराचे नाव वेळोवेळी बदलण्यात आले आहे. मुघलांपासून ब्रिटिशांपर्यंत सर्वांनी या शहराच्या नावात बदल केलेला आहे. ब्रिटिश राजवटीत कानपूर हे सत्तेचे एक प्रमुख केंद्र होते. कानपूरचे नाव शेवटचे १९४८ मध्ये बदलण्यात आले असे म्हटले जाते. ब्रिटिश राजवटीत या शहराला कॉनपूर असे म्हटले जात होते. मात्र स्वातंत्र्यानंतर या शहराचे नाव कानपूर असे करण्यात आले. त्या काळात ते एक महत्त्वाचे औद्योगिक केंद्र होते.



## बांगलादेशात मुस्लीम संघटनेकडून हिंदू नेत्याला निवडणुकीचे तिकीट

■ ढाका



**बांगलादेशात** फेब्रुवारी २०२६ मध्ये सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जमात-ए-इस्लामी या कट्टरपंथी मुस्लीम संघटनेने खुलाना-१ मतदारसंघातून कृष्णा नंदी या हिंदू नेत्याला उमेदवारी दिली. त्यामुळे बांगलादेशाच्या राजकारणात चर्चांना उधाण आले आहे. जमात-ए-इस्लामीचे हे पाऊल आश्चर्यकारक असून, बांगलादेशच्या राजकारणात एक नवे वळण आणण्याची शक्यता आहे.

अनेक दशकांपासून खुलाना-१ मतदारसंघावर हिंदू नेत्याचेच वर्चस्व आहे. १९९६ पासून हिंदू उमेदवाराची खासदार म्हणून निवड केली जात आहे. यामुळे जमात-ए-इस्लामीने यावेळी देखील हिंदू उमेदवाराला राजकारणात पुढे करून वेगळा प्रयोग केला आहे. कृष्णा नंदी हे अत्यंत लोकप्रिय नेते आहे.त्यांची संघटनेवर पकड मजबूत असून हिंदू मतदारांना ते सहज एकत्र आणू शकतात. यामुळे कृष्णा नंदी यांना खुलाना-१ चे तिकीट देण्यात आले आहे. कृष्णा नंदी हे २००३ पासून जमात-ए-इस्लामीचे सदस्य आहे.

देश विदेश

## सुदानमध्ये पुन्हा हिंसाचार शाळेवर हल्ला! ५० ठार

■ कैरो

**सुदानमध्ये** पुन्हा हिंसाचार उसळला असून, सुदानच्या निमलष्करी (आरएसएफ )दलाच्या सैनिकांनी दक्षिण मध्य सुदानमध्ये कॉर्डोफान येथील लहान मुलांच्या शाळेवर ड्रोन हल्ला केला. त्या हल्ल्यात ३३ लहान मुलांसह ५० जणांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच एक वैद्यकीय पथक घटनास्थळी पोहोचले. मात्र पथकाला देखील लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यामुळे परिसराचा संपर्क तुटला.

या दोन्ही लष्करी गटांत दोन वर्षांहून अधिक काळापासून हा संघर्ष सुरू आहे. त्यामुळे सुदानमधील लोकांना मोठा फटका सहन करावा लागत आहे. या हल्ल्याचा मानवाधिकार संघटनांनी निषेध केला असून, विशेष करून महिला आणि मुलांवरील हल्ल्यांना मानवाधिकार संघटना उल्लंघन मानले जात आहे. मानवाधिकार संघटना युनिसेफने आरएसएफ आणि सुदानी सैन्याला हल्ले थांबवण्याची विनंती केली.गरजूंना मानवतावादी मदत पोहोचवण्याची विनंती देखील केली. आरएसएफने अल-फाशेर शहरावर ताबा केला. यामुळे दारफुरमध्ये सुदानी लष्काराने हल्ला सुरू केला.

## उत्तर गोव्यातील उगवे भागात ओंकार हत्तीकडून वाहनांची तोडफोड

■ पणजी

**उत्तर** गोव्यातील पेडणे तालुक्यातील उगवे कासुले परिसरात सध्या ओंकार हत्तीने बस्तान मांडले आहे. हा हत्ती कवाथे, केळी यांची नासधूस करत असून, आता तो रात्री लोकवस्तीत घुसून लाल व पांढऱ्या रंगाच्या वाहनांची तोडफोड करत आहे.

ओंकार हत्तीने वाहनांची मोडतोड करायला सुरुवात केल्यामुळे स्थानिक भयभीत झाले आहेत. रात्री ९-१० वाजल्यानंतर ओमकार हत्ती लोकवस्तीत प्रवेश करून स्थानिकांची झोपमोड करत आहे. कवाथे, केळी खाण्याबरोबरच तीन आणि चार चाकी वाहनांचे नुकसान करत आहे. हा हत्ती जातो कुठे, काय करतो याच्यावर वन खात्याचे कर्मचारी पाळत ठेवण्याशिवाय दुसरे काहीच करू शकत नाहीत. यामुळे त्रस्त झालेल्या उगवेवासीयांनी सरकारला इशारा दिला की, सरकारने आमच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये.कायदा हातात घेतला तर स्थानिकांना दोष देऊ नका. त्याअगोदर या ओंकार हत्तीचा बंदोबस्त करा, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

## कार-ट्रेलर समोरासमोर धडक! ५ मित्रांचा मृत्यू

■ रायपूर

**छत्तीसगडमधील** जशपूर जिल्ह्यात आय-२० कार आणि ट्रेलर यांच्यात समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला. हा अपघात काल रात्री राष्ट्रीय महामार्ग -४३ वर पतराटोलीजवळ झाला.

राधेश्याम यादव ( २६), उदय कुमार चौहान, (१८), सागर तिर्की (२२), अंकित टिग्गा ( १७ ) दीपक प्रधान (१९) हे आपल्या मोटारीने यात्रेवरून परत येत होते. ते सर्व एकाच गावाचे रहिवासी होते. पतराटोलीजवळ अचानक समोर ट्रेलर आल्याने चालकाचे नियंत्रण सुटून थेट धडक झाली. धडक इतकी भीषण होती की कारमधील सर्व ५ तरुणांचा जागीच मृत्यू झाला. कारच्या पुढील भागाचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला.

## दक्षिण आफ्रिकेतील बारमध्ये गोळीबार! ११ जणांचा मृत्यू

■ डर्बन

**दक्षिण** आफ्रिकेतील प्रिटोरियाजवळील सोल्सविले टाऊनशिपमध्ये बेकायदेशीर बारमध्ये झालेल्या गोळीबारात ३ मुलांसह ११ जणांचा मृत्यू झाला, तर १४ जण जखमी झाले असून, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मृतांमध्ये ३ वर्षांचा, १२ वर्षांचा मुलगा आणि १६ वर्षीय मुलीचा समावेश आहे. हा ३ वर्षांचा मुलगा बारच्या मालकाचा आहे.



काही लोक बेकायदेशीर बारमध्ये दारू पित असताना हा हल्ला झाला. तीन अज्ञात हल्लेखोर पहाटे ४.३० वाजता बारमध्ये घुसले आणि त्यांनी लोकांवर अंदाधुंद गोळीबार सुरू केला. त्यामुळे लोकांची पळापळ सुरू झाली. या गोळीबारात १० जणांचा जागीच मृत्यू झाला,तर एका रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. पोलीस प्रवक्त्या एथेलिंडा मॅथे म्हणाल्या की, या हल्ल्याचा हेतू अस्पष्ट आहे आणि कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.जखमींमध्ये बेकायदेशीर बारच्या मालकाचाही समावेश आहे. परवाना नसलेले बार आमच्यासाठी एक मोठी समस्या आहे. कारण बहुतेक घटना येथे घडतात. लोक एकमेकांवर हल्ला करतात.

## २१ डिसेंबरच्या निकालाआधी कार्यकर्त्यांचा पैजांचा सिलसिला

■ सोलापूर

**राज्यातील** २६४ नगरपालिका आणि नगरपरिषदेच्या निवडणुकासाठी २ डिसेंबरला मतदान झाले. यानंतर आता सर्वांचे लक्ष २१ डिसेंबरला लागणाऱ्या निकालाकडे आहे. याच पार्श्वभूमीवर सोलापूर - कोल्हापूरमध्ये कार्यकर्त्यांचा पैजांचा सिलसिला रंगला आहे. अकलूजमध्ये नगराध्यक्ष कोण होणार यावर बुलेटची पैज लावली. तर कोल्हापुरात कोण जिंकणार यावरून १ लाख रुपयांची पैज लागल्याने चर्चा रंगली. अकलूज नगरपालिकेत राष्ट्रवादीचे मोहिते-पाटील आणि भाजपाचे राम सातपुते यांच्यात प्रतिष्ठेची लढत आहे. नगराध्यक्षपदासाठी भाजपाकडून पूजा कोथमीरे तर राष्ट्रवादीकडून रेश्मा अडगळे रिंगणात आहेत.

## पालिका निवडणुकीपूर्वी गारगाई धरणासाठी निविदा मागवणार

■ मुंबई

**आगामी** पालिका निवडणुकीपूर्वी मुंबई महापालिका त्यांच्या महत्त्वाकांक्षी गारगाई धरण प्रकल्पाच्या दिशेने मोठे पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. या प्रकल्पाकरिता राष्ट्रीय वन्यजीव मंडळ आणि वन विभागाकडून महत्त्वाच्या मंजुरी अद्याप प्रलंबित असल्या तरी पालिका येत्या आठवड्यात या प्रकल्पासाठी निविदा मागवण्याची शक्यता आहे. मुंबईकरांना पाणीपुरवठा करणारे हे आठवे धरण असेल. गारगाई प्रकल्पामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यात दररोज ४४० दशलक्ष लीटर (एमएलडी)ची भर पडणार आहे.

**६ गावांना प्रकल्पाचा फटका**

प्रस्तावित गारगाई धरणामुळे तानसा वन्यजीव अभयारण्यातील ६५८ हेक्टर वनजमीन पाण्याखाली जाणार आहेत. ओगडा आणि खोडाडा ही दोन गावे पूर्णपणे पाण्याखाली जातील तर पाचघर, तिलमाळ, फणसगाव आणि आमले ही गावे अंशत: बाधित होतील. प्रकल्पग्रस्तांचे पालघर जिल्ह्यातील देवळी तालुक्यात वन विकास महामंडळाच्या ४०० हेक्टर जमिनीवर स्थलांतरित केले जाईल.

मुंबईला सध्या सात विद्यमान तलावांमधून सुमारे ४,००० एमएलडी पिण्याचा पाणी पुरवठा होतो. तरी मुंबईला ५०० एमएलडी पाणीटंचाईचा तुटवडा जाणवतो. सातवे धरण मध्य वैतरणा असून, २०१४ मध्ये ठाणे जिल्ह्यातील मोखाडा येथे बांधण्यात आले. त्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळात रखडलेला गारगाई धरण प्रकल्प आता पुढे सरकणार आहे. पालिका निवडणुका जवळ येत असताना महायुती सरकारने या धरणासाठी निविदा काढण्याचे आणि प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

## कार पेटून पोलीस अधिकाऱ्याचा मृत्यू

■ बेळगाव



**एका** भरधाव कारने दुभाजकाला धडकल्यानंतर अचानक पेट घेतला. या दुर्घटनेत लोकायुक्त विभागातील पोलीस निरीक्षक पंचाक्षरी सालीमठ यांचा होरपळून गाडीतच मृत्यू झाला. हा भीषण अपघात कर्नाटकातील धारवाडजवळील गदग-हुबळी राष्ट्रीय महामार्गावर अरेरा पुलाजवळ घडला. पोलीस निरीक्षक पंचाक्षरी सालीमठ हे शुक्रवारी सायंकाळी अन्निगिरी तालुक्यातील भद्रापूरहून आपल्या कुटुंबियांची भेट घेऊन हावेरीकडे परतत होते. त्यावेळी त्यांची कार गदग-हुबळी राष्ट्रीय महामार्गावर अरेरा पुलाजवळ आल्यावर दुभाजकाला धडकली.

## विश्रामबागेत क्रांतिसिंह नाना पाटील यांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली

■ सांगली

**सांगलीतील** विश्रामबाग परिसरात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास आज पुरोगामी संघटना तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. क्रांतीसूर्य नाना पाटील यांच्या कार्याची आठवण ठेवत त्यांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाला ॲड अजित सूर्यवंशी, ॲड तेजस्विनी सूर्यवंशी, डॉ. संजय पाटील, प्रमोद लाड, पद्माकर जगदाळे, माजी महापौर दिग्विजय सूर्यवंशी, माजी नगरसेवक संतोष पाटील, माजी नगरसेविका रोहिणी पाटील, नंदिनी बिरजे, जब्बार बारस्कर स्थानिक सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे प्रतिनिधी, नागरिक व युवा मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सातारा जिल्ह्यात थंडीची लाट महाबळेश्वरचा पारा १३ अंशांवर

■ सातारा

**गेल्या** दोन दिवसांपासून सातारा जिल्ह्यात थंडीची लाट निर्माण झाली आहे. काल शनिवारी तर थंड हवेचे ठिकाण असलेल्या महाबळेश्वरचा पारा १३.२ अंश तर सातारचा पारा १६.६ अंशावर गेला होता.

वाढत्या थंडीमुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागासह शहरी भागात चौकाचौकात शेकोट्या पेटलेल्या दिसत आहेत. शेकोटीभोवती गप्पांचे फड रंगत आहेत. थंडीपासून बचाव करण्यासाठी उबदार कपड्यांना बाजारपेठेत मागणी वाढली आहे. मोती चौक, राजवाडा, राजपथ,जि.प.मैदान परिसर,पोवईनाका, खणआळी परिसरात उबदार कपडे खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढू लागली आहे. स्वेटर, जर्कीन्स, हॉफ स्वेटर, उबदार टोपी, हातमोजे, शाल, मफलर, अन्य साहित्याला ग्राहकांमधून चांगली मागणी आहे. थंडीची तीव्रता गेल्या काही दिवसांमध्ये कमी-जास्त होवू लागली आहे.

## बांगलादेशने घेतला अखेर कांदा आयातीचा निर्णय

■ लासलगाव

**बांगलादेश** सरकारने आजपासून मर्यादित प्रमाणात कांदा आयात पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे भारतातील कांदा निर्यातदारांना दिलासा मिळणार आहे. देशांतर्गत बाजार स्थिर ठेवण्यासाठी बांगलादेशने दररोज ५० आयात परवाने देण्याची घोषणा केली असून, प्रत्येक परवान्याने ३० टन कांदा आयात करता येणार आहे.

बांगलादेशने घेतलेल्या या निर्णयाचा थेट फायदा भारताच्या कांदा निर्यात क्षेत्राला होईल, असे व्यापार मंडळाचे मत आहे. बांगलादेश हा भारताचा परंपरागत व मोठा कांदा आयातदार देश आहे. मागील काही महिन्यांपासून बांगलादेशात आयात बंद असल्याने महाराष्ट्रातील नाशिक, लासलगाव, पिंपळगावसह आशियातील मोठ्या कांदा बाजारांवर त्याचा परिणाम दिसून येत होता. निर्यात मार्ग खुला होताच भारतीय कांदा व्यापाराला आणि दर स्थिरतेला आधार मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मर्यादित आयात परवाने मिळूनही बांगलादेशकडून मागणी वाढेल. यामुळे सध्या घटलेल्या कांदा दरांमध्ये काही प्रमाणात सुधारणा होऊ शकते. बांगलादेश सरकारने स्पष्ट केले आहे की, नियंत्रित पद्धतीने आयात प्रक्रिया बाजारस्थिती पाहून पुढील आदेशापर्यंत सुरू राहील. त्यामुळे आगामी काही आठवड्यांत भारतातून बांगलादेशकडे होणाऱ्या कांदा निर्यातीला गती येण्याची शक्यता आहे.

**भारतीय कांद्याच्या व्यापाराला स्थिरता**

## पालिका रुग्णालयातील अभियंत्यांवर अतिरिक्त भार! परिपत्रक रद्द करा

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने अलीकडेच जारी केलेल्या परिपत्रकानुसार के. ई.एम., सायन, नायर रुग्णालय आणि नायर दंत रुग्णालयातील स्थापत्य व यांत्रिकी-विद्युत विभागातील सहाय्यक अभियंत्यांना उपनगरीय रुग्णालयांच्या तांत्रिक कामांची अतिरिक्त जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या निर्णयाला बृहन्मुंबई म्युनिसिपल मजदूर इंजिनिअर्स युनियनने तीव्र विरोध केला आहे. यासंदर्भात बृहन्मुंबई म्युनिसिपल मजदूर इंजिनिअर्स युनियनने आयुक्तांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे की, या रुग्णालयांमध्ये तांत्रिक कामांचा व्याप आधीच जास्त असून, उपलब्ध मानवी संसाधन मर्यादित आहे. त्यातच अतिरिक्त जबाबदारीमुळे रुग्णालयांतील दुरुस्ती, देखभाल आणि अत्यावश्यक तांत्रिक सेवांमध्ये खोळंबा व विलंब होण्याची शक्यता आहे. उपनगरीय रुग्णालयांतील अभियंता पदांतील रिक्त जागांबाबत प्रथम नगर अभियंता व प्रमुख अभियंता यांच्याकडे प्रस्ताव पाठवला गेला असता तर ही स्थिती टाळता आली असती. कोणतीही पूर्व चर्चा न करता प्रमुख रुग्णालयांतील अभियंत्यांना बाहेरील कामे देणे अयोग्य व अन्यायकारक आहे.

## कोल्हापूरच्या शिरोली डोंगरावर तब्बल १५ गव्यांचा कळप

■ कोल्हापूर

**करवीर** तालुक्यातील शिरोली परिसरातील कासारवाडी, गिरोली, सादळे-मादळे भागात गव्यांच्या कळपाचा वावर वाढला आहे. सकाळी शिरोली दुमाला ते नरगेवाडी मार्गावरील गळी माळ नावच्या डोंगरावर तब्बल १५ गव्यांचा कळप दिसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास विशाल पाटील हे त्यांच्या जनावरांच्या गोठ्याकडे चालले होते. त्यावेळी त्यांना हा गव्यांचा कळप दिसला. एकाचवेळी मोठ्या संख्येने गवे आल्याचे पाहून पाटील यांनी तत्काळ ग्रामपंचायत व काही ग्रामस्थांना याची माहिती दिली. त्यानंतर सरपंच सचिन पाटील, सदस्य अरुण पाटील, सागर घोटणे, लिपीक शिवकुमार पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. गावकऱ्यांनी गव्यांना या परिसरातून हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. दिवसभर ग्रामस्थ गव्यांना हुसकावण्याचा प्रयत्न करत होते. मात्र गवे त्याच परिसरात घुटमळत राहिले. त्यामुळे सरपंच सचिन पाटील यांनी वनविभागास संपर्क करून याची कल्पना दिली.

## विरार इमारत दुर्घटना प्रकरण गोन्साल्विसना पोलीस कोठडी

■ वसई

**१७ निष्पाप** नागरिकांचा बळी घेणाऱ्या विरार येथील इमारती विरोधात विहित मुदतीत कारवाई न केल्यामुळे सहाय्यक आयुक्त गिल्सन गोन्साल्विस यांना अटक केल्यानंतर त्यांना वसई न्यायालयाने १० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. अवघ्या दीड महिन्यांवर त्यांची सेवानिवृत्ती असताना ही कारवाई करण्यात आली.

बेकायदेशीर व धोकादायक असलेली इमारत रिकामी करून एमआरटीपी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला नसल्याचा ठपका गोन्साल्विस यांच्यावर ठेवण्यात आला होता. विरार पूर्वेस विजयनगर परिसरात असलेली रमाबाई अपार्टमेंट ही ४ मजली इमारत २६ ऑगस्ट २०२५ रोजी कोसळली होती. त्यात १७ जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांनी या गुन्हे शाखा युनिट-३ कडे सोपविला होता. यात पोलिसांनी विकासकासह पाच आरोपींना अटक केली होती. त्यापैकी चार आरोपींना जामीन मिळाला. या प्रकरणाची चौकशी करत असताना गुन्हे शाखा युनिट ३ ने आता मनपाच्या प्रभाग (सी) चे सहायक आयुक्त गिल्सन गोन्साल्विस यांनी ही इमारत धोकादायक असतानाही ती रिकामी न करता विकासकाच्या विरोधात गुन्हा दाखल न केल्याने त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता.

## वाळू घाटांचे लिलाव महिनाअखेर पूर्ण करण्याचा निर्देश

■ मुंबई

**वाळू** घाटांच्या लिलावाकरिता पर्यावरण समितीकडून मंजुरी घेण्याची कार्यवाही पूर्ण करून राज्यातील वाळू घाटांचे लिलाव ३० डिसेंबरपर्यंत पूर्ण करा. तसेच वाळू धोरणात घरकुल बांधणीसाठी देण्यात येणारी कार्यवाही गतीने करावी, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. वाळू धोरणासंदर्भात नुकतीच मंत्रालयात एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महसूल मंत्री बावनकुळे हे दूरदृश्यप्रणालीव्दारे बोलत होते. बैठकीला महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, राज्यातील सर्व महसूल विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्यप्रणालीव्दारे उपस्थित होते. यावेळी महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, वाळू घाटांचे लिलाव विहित वेळेत होण्यासाठी महसूल अधिकाऱ्यांनी गतीने आणि शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी. या लिलावासाठी पर्यावरण व महसूल विभागाने परस्पर सामंजस्य ठेवून काम करावे. पर्यावरण विभागाकडून मिळालेल्या परवानगीनंतर कोणताही विलंब न लावता वाळू घाटाचे लिलाव केले जावे. वाळूचा अवैध उपसा व वाहतूक, चोरी होऊ नये यासाठी कायदेशीर काटेकोरपणे उपाययोजना कराव्यात. या बैठकीत महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी विभागनिहाय व जिल्हानिहाय वाळू धोरणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला.

## चैत्यभूमी परिसरात पालिकेची विशेष स्वच्छता मोहीम

■ मुंबई

**चैत्यभूमी** आणि शिवाजी पार्क मैदान परिसरातील विविध ठिकाणी आज महापालिकेकडून विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे स्वच्छता कर्मचारी, विविध सामाजिक संस्थांचे स्वयंसेवक मिळून विविध संयंत्रांच्या सहाय्याने परिसरातील प्रमुख व अंतर्गत रस्ते, दुभाजक, पदपथ, राजगृह, दादर रेल्वे स्थानक परिसर, वडाळा येथील डॉ. आंबेडकर कॉलेज परिसरासह ठिकठिकाणची संपूर्ण स्वच्छता केली. संकलित केलेल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली असल्याचे पालिका अधिकारी यांनी सांगितले.

## देवगडच्या मिठबाव गावात १३ डिसेंबरपासून पाच दिवसीय डाळपस्वारी

**देवगड** - मिठबाव श्री देव रामेश्वर ५ दिवसीय डाळपस्वारीचे यंदाचे वेळापत्रक घोषित करण्यात आले. १३ ते १७ डिसेंबरदरम्यान देवतरंग आणि सेवक भेटींच्या धार्मिक वातावरणात डाळपस्वारी पार पडणार आहे. रामेश्वर डाळपस्वारीच्या पहिल्या दिवशी १३ डिसेंबर रोजी पहाटे रामेश्वर मंदिरात गावघर बारापाच देव सेवकांच्या उपस्थितीत ८ वाजता मंदिरातून प्रस्थान, दुपारी १ वाजता उत्कटवाडी गणेश मंदिरात भोजन, रात्री ९ वाजता सुभेदार सेवक भेट व भोजन, ११वाजता झाडाखाली स्थिर होऊन विश्रांती व मुक्काम, १४ डिसेंबर रोजी वैयक्तिक न्याय, सकाळी ८ वाजता विठ्ठल-रखुमाई मंदिर, डाळप खळ्यावर भेट,१७ डिसेंबरला अंतिम दिवशी मंदिरात प्रस्थान झाल्यानंतर डाळपस्वारीची सांगता होईल.

SINCE : 1900
LAXMI®
HING
Required
Sales Executive
For Mumbai (Central & Western area)
चांगले संवाद कौशल्य असलेले पात्र उमेदवार.
खाद्य उद्योगात किमान 2 वर्षांचा अनुभव.
Walk-In Interview with resume
सोमवार , 08 डिसेंबर आणि बुधवार, 10 डिसेंबर दुपारी 2.00 ते 6.00 दरम्यान खालील पत्त्यावर भेट द्यावी.
RMK ASSOCIATES
404-A, Damji Shamji Trade Center, Near Vidyavihar Station, Vidyavihar (W), Mumbai - 400086
+91 916 766 2203

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# गोव्यातील पर्यटनाला आगीची झळ

कोणत्याही प्रकारची दुर्घटना ही अचानकपणे किंवा अकस्मातच घडत असते. कोणतीही पूर्वकल्पना नसताना घडून येणारा हा प्रकार अपघात म्हणूनही नोंदवला जातो किंवा ओळखला जातो. परंतु या सगळ्या दुर्घटनांमधून निष्कर्ष एकच निघतो की, कुठेतरी निष्काळजीपणा, जबाबदारपणा आणि हलगर्जीपणा झालेला असतो. किंबहुना या सगळ्या दुर्घटनांची शक्यता लक्षात घेऊन जी अतिदक्षता बाळगणे गरजेचे असते ती सुद्धा दुर्लक्षित केली जाते. गोव्याला पणजीपासून २५ किलोमीटर असलेल्या आरपोरा येथे बर्च बाय रोमिओ लेन या नाईट क्लब मध्ये लागलेली आग ही अशीच पुरेशी दक्षता आणि व्यवस्थापन नसल्याने लागल्याचे स्पष्ट होते. या नाईट क्लबमध्ये सिलिंडरचा स्फोट झाला आणि त्यातून आग भडकली. ज्यामध्ये त्या क्लबमध्ये काम करणारे जवळजवळ २५ जण होरपळून ठार झाले आहेत आणि शिवाय दोन किंवा तीन पर्यटकांचा त्यात मृत्यू झाल्याचे सांगितले जाते आहे. इतक्या मोठ्या संख्येने जेव्हा आगीच्या भक्ष्यस्थानी लोकांना होरपळून जीव गमवावा लागतो त्यावेळेला अशा मोठ्या हॉटेल्स किंवा क्लबमधून आग लागणारच नाही इथपासून ते आग लागलीच तर ती काही मिनिटांत विझवण्याची व्यवस्था असणे अत्यंत आवश्यक ठरते. गोवा हे जगातले एक मोठे पर्यटन केंद्र म्हणून ओळखले जाते. या राज्यामध्ये पर्यटन हाच मोठा व्यवसायदेखील मानला जातो. किंबहुना या राज्याची अर्थव्यवस्था ही तिथल्या पर्यटन व्यवसायावरच पोसली जाते याचा अर्थ तिथे येणाऱ्या लाखो पर्यटकांची संख्या आणि या सगळ्या पर्यटकांची सोय किंवा व्यवस्था बघणारे हॉटेल्स, लॉज किंवा त्याच्याशी संबंधित इतर गोष्टी लक्षात घेतल्या तर त्यात काही लाख लोक कामही करत असतात. यावरून रोज दहा-पंधरा लाख लोकांच्या उदरनिर्वाहाबरोबरच उद्योग व्यवसायाचा मोठा स्त्रोत म्हणून या पर्यटनाकडे बघितले जाते. जर एखाद्या राज्याचा प्रमुख व्यवसाय पर्यटन असेल, तर या पर्यटन क्षेत्राशी संबंधित सगळ्या बारीकसारीक गोष्टींचे अतिशय काटेकोर नियोजन होणे तितकेच गरजेचे ठरते. अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग ठरणाऱ्या गोव्यासारख्या राज्यात पर्यटनाच्या बाबतीत लोकांमध्ये प्रचंड उत्सुकता असते आणि तिथे येणाऱ्यांची संख्या दरवर्षी वाढत असते.

### व्यवस्थापनाचा निष्काळजीपणा

अर्थात गोव्यामध्ये इतक्या मोठ्या संख्येने पर्यटक येऊनही दुर्घटना किंवा अपघात होण्याचे प्रमाण तुलनेने अन्य राज्यांपेक्षा कमी असते हे देखील वस्तुस्थिती आहे. परंतु हा जर लौकिक गोवा राज्याला प्राप्त झालेला असेल की, तिथे इतक्या मोठ्या संख्येने पर्यटक येतात आणि त्या पर्यटकांची अधिकाधिक चांगली व्यवस्था ठेवून कुठलाही घातपात किंवा अपघात होणार नाही, कुठल्याही पर्यटकांना दुर्घटनेचे बळी व्हावे लागणार नाही याची जर दक्षता घेतली जात असेल तर ते गोवा राज्यासाठी अतिशय महत्त्वाची ठरते. आतापर्यंतचा जर हा लौकिक असेल तर तो लौकिक टिकवून ठेवण्याचे काम गोवा सरकारने आणि तिथल्या पर्यटन विभागाने करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आताच्या या दुर्घटनेमध्ये २५ जणांचा बळी जाणे हे अत्यंत वेदनादायक आहे. सिलिंडरचा स्फोट हे जरी या आगीमागचे कारण असले तरी अशा प्रकारचे स्फोट घडून येऊ शकतात. विजेच्या बाबतीत शॉर्टसर्किटसारखे प्रकार घडून येऊ शकतात. कारण असे प्रकार देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने यापूर्वी घडून आलेले आहेत. सिलिंडरचा स्फोट होणे, शॉर्टसर्किट होणे आणि त्यातून आग भडकणे हा प्रकार सरसकट अनेक ठिकाणी पाहायला मिळतो. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, इतक्या प्रकाराने आगी लागण्याचे कारण माहीत असताना त्याबाबत अत्यंत संवेदनशील राहून सावधानता बाळगणे गरजेचे आहे. स्वाभाविकपणे सगळे नाईट क्लब किंवा हॉटेल्स असतील किंवा लॉज असतील. एवढेच नव्हे तर गोव्यामध्ये पर्यटकांना समुद्रात सफर घडवून आणणाऱ्या क्रूझचा मोठा समावेश असतो आणि अशा मोठ्या नाव किंवा बोटींवर सुद्धा आवश्यक तेवढी सुविधा ठेवली जाणे गरजेचे आहे. ती ठेवण्याचा प्रयत्न होतही असतो. परंतु त्याबाबत संबंधित हॉटेल मालक किंवा बोट मालक यांनी सुद्धा तितकीच सावधानता बाळगण्याची आवश्यकता आहे. अर्थात बऱ्याच वेळेला हॉटेल चालक-मालक किंवा बोटीचे संचालक हे हलगर्जीपणा करून दुर्लक्ष करतात. यासाठी सरकारी यंत्रणेने एका विशिष्ट कालावधीत दुर्घटना टाळण्यासाठी या सर्व गोष्टी व्यवस्थित आहेत की नाही याची खातरजमा करून घेतली पाहिजे.

### डिसेंबर जानेवारीतली गर्दी

ज्याला आपण इन्स्पेक्शन म्हणून अशा प्रकारची उपाययोजना, दुर्घटना टाळू शकतात. म्हणूनच केवळ अचानकपणे आग लागणे किंवा अपघात घडणे याला आपण एक दुर्घटना म्हणून संबोधत असतो. ती दुर्घटना असतेच. कारण त्यामध्ये जाणारे अनेकांचे मृत्यू हे अत्यंत दुर्दैवी आणि क्लेशकारक ठरतात. परंतु ही दुर्घटना घडू नये यासाठी उपाययोजना करणारे चाणाक्ष आणि उत्कृष्ट व्यवस्थापन सगळ्या ठिकाणी आवश्यक झालेले आहे. आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगामध्ये अनेक प्रकारच्या दुर्घटनांची पूर्वसूचना मिळू शकते. आणि ज्या ठिकाणी स्फोट किंवा शॉर्टसर्किट होण्याची शक्यता असते त्या ठिकाणी सुद्धा यंत्रणा बसवून धोके टाळता येऊ शकतात. बदलणाऱ्या काळाबरोबर पर्यटन क्षेत्रातील किंवा अगदी रस्ते वाहतुकीसारख्या सर्वच ठिकाणी अधिकाधिक दक्षता घेण्याची वेळ आलेली आहे. कारण साधारणपणे गेल्या ४०-५० वर्षांपासून भारताच्या पर्यटन क्षेत्रामध्ये अमूलाग्र बदल घडून आलेला आहे. गोव्यासारखे सर्वांना आकर्षित करणारे पर्यटन क्षेत्र आणि आता ज्या डिसेंबरमध्ये गोव्यात सर्वाधिक पर्यटक येतात आणि हा सगळा डिसेंबर, जानेवारीचा महिना गोव्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. अशा कालावधीत तर या संदर्भातल्या दक्षता अधिक काळजीपूर्वक घेतल्या गेल्या पाहिजेत आणि तिथले व्यवस्थापन आणि सरकारी यंत्रणांचे नियोजन अधिक काटेकोर करण्याची आवश्यकता आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

संवाद हे फक्त शब्दांचे माध्यम नसून, तो एक मानसिक पूल आहे. जो माणसाला माणसांशी जोडतो.

## पंचांग

**सोमवार, ८ डिसेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**मार्गशीर्ष कृष्ण चतुर्थी**
**नक्षत्र : पुष्य**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कर्क**

**रवी उदय- ०७-०१**
**रवी अस्त- १८-००**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in

**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### ताकातील पालकची भाजी



★ **साहित्य :-** १ जुडी पालक बारीक चिरून, २ वाटी ताक, ८-९ पाकळ्या लसूण, हळद, हिरव्या मिरच्या, काश्मीरी लाल मिरची पावडर, फोडणीसाठी तेल, १ वाटी भिजवलेले शेंगदाणे, १ वाटी भिजवलेली चणाडाळ, २ चमचे बेसन, १ चमचा मेथीचे दाणे, हिंग,१ चमचा जिरे, चवीनुसार मीठ.

★ **कृती :-** एका भांड्यात ताक घ्या. त्यामध्ये बेसन घाला. ते नीट मिक्स करून घ्या. त्यात गुठळ्या राहणार नाहीत याची काळजी घ्या. कढईमध्ये तेलाची फोडणी तयार करायची. तेलामध्ये जिरे घाला. ते तडतडले की त्यात मेथीचे दाणे घाला. हिंग घाला. हिरव्या मिरचीचे तुकडे घाला. ते परतले की, त्यात ठेचलेला लसूण घाला. लसूण चांगला परतला की त्यामध्ये भिजवलेले शेंगदाणे, चणाडाळ घाला. सर्व चांगले मिक्स करून परतून घ्या. त्यावर मग चिरलेला पालक घाला. ढवळून झाकून ठेवा. छान शिजू द्या. ५ मिनिटांनंतर आता तयार असलेले ताक-बेसनाचे मिश्रण त्यात हळूहळू ओता. त्यात गुठळ्या पडणार नाहीत याची काळजी घ्या. छान ढवळून झालं की, त्याला चांगली उकळी येऊ द्या. त्यात चवीपुरते मीठ घाला. बाजूला वेगळी फोडणी तयार करून घ्या. ज्यामध्ये थोडं जिरे, लसूण घाला. लाल मिरची पावडर घाला आणि हळद घाला. ती फोडणी तयार झाल्यावर भाजीवर ओता. थोडा वेळ भाजी उकळली की, गरमागरम खायला द्या.



# ऑस्ट्रेलियाने अॅशेसची दुसरी कसोटी जिंकली

## स्टार्कच्या घातक गोलंदाजीसमोर इंग्लंड गारद



**ब्रिस्बेनमधील गाबा क्रिकेट स्टेडियममध्ये दिवस-रात्र स्वरुपात झालेल्या अॅशेस कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्याच्या चौथ्या दिवशी आज ऑस्ट्रेलियाने मिचेल स्टार्क आणि मायकेल नेसर यांच्या घातक गोलंदाजीच्या जोरावर इंग्लंडचा ८ विकेटने पराभव केला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने ५ कसोटींच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली. इंग्लंडचा दुसरा डाव २४१ धावांवर आटोपला. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला विजयासाठी नाममात्र ६५ धावांचे लक्ष्य मिळाले आणि ते ऑस्ट्रेलियाने २ गडी गमावून १० षटकांत पूर्ण केले. ७७ धावा आणि ८ गडी बाद करणाऱ्या मिचेल स्टार्कला सामनावीर म्हणून घोषित केले.**

■ ब्रिस्बेन

**प्रथम** फलंदाजी करताना इंग्लंडचा संघ ३३४ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने ५११ धावा केल्या आणि पाहुण्या संघावर १७७ धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावातही इंग्लंडची परिस्थिती बिकट झाली. काल तिसऱ्या दिवसअखेर इंग्लंडने ३५.० षटकांत ६ बाद १३४ धावा केल्या होत्या.

आज चौथ्या दिवशी कर्णधार बेन स्टोक्स आणि विल जॅक्स यांनी संघाचा डाव सावरला. मात्र इंग्लंडची धावसंख्या ६ बाद २२४ वर पोहोचताच विल जॅक्स ४१ धावांवर झेलबाद झाला. त्यानंतर लगेच बेन स्टोक्सने ५० धावा करून तंबूत परतला. गस अॅटकिन्सन (३) आणि ब्रायडन कार्से (७) हे देखील झटपट बाद झाले. जोफ्रा आर्चर ५ धावांवर नाबाद राहिला. इंग्लंडला दुसऱ्या डावात फक्त २४१ धावाच करता आल्या. परिणामी इंग्लंडने यजमान संघासमोर फक्त ६५ धावांचे लक्ष्य ठेवले. चौथ्या डावात लक्ष्याचा पाठलाग करताना ट्रॅव्हिस हेडने २२ धावा आणि मार्नस लाबुशेनने ३ धावा केल्या. दोघांची विकेट अॅटकिन्सनने घेतल्या. मात्र कर्णधार स्टीव्ह स्मिथ (२३)आणि जेक वेदरलँड (१७) यांनी एकत्रितपणे संघाची धावसंख्या ६५ पर्यंत नेली आणि विजय निश्चित केला. स्टार्कने दोन्ही डावांत ८ विकेट घेतल्या, तर स्टार्कने पहिल्या डावात फलंदाजीत ७७ धावा करत त्याच्या संघाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. ऑस्ट्रेलियाच्या मायकेल नेसरनेही गुलाबी चेंडूने इंग्लंडविरुद्ध जोरदार खेळ केला.

## सुरुची सिंगला सुवर्णपदक मनू भाकर पदकापासून वंचित

■ दोहा

**हंगामाच्या** अखेरच्या आयएसएसएफ विश्वचषक अंतिम फेरीच्या पहिल्या दिवशी भारताने शानदार सुरुवात केली. या फेरीत भारतीय प्रतिभावान नेमबाज सुरुची सिंगने २४५.१ गुणांसह सुवर्णपदक जिंकून भारताचा दिवस उजळवला. माजी ज्युनियर विश्वविजेत्या संयमने २४३.३ गुणांसह देशासाठी रौप्यपदक निश्चित केले. ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकर १७९.२ गुणांसह पाचव्या स्थानावर राहिली. या वर्षाच्या सुरुवातीला सलग ४ सुवर्णपदके जिंकल्यानंतर सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये सुरूची जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर होती.

## पुणे मॅरेथॉनमध्ये इथिओपियाचा हैमानोत, भारताची साक्षी जडियाल अव्वल

■ पुणे

३९ व्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेमध्ये यंदा देखील पुरुष गटात इथिओपियाच्या खेळाडूंनी बाजी मारली आहे. इथिओपियाच्या टेरेफे हैमानोत याने २ तास २० मिनिटे ०८ सेकंदमध्ये ४१ किमी अंतर पूर्ण केले तर पूर्ण मॅरेथॉन महिला गटात भारताची साक्षी जडियाला हिने २ तास ३९ मिनिटे ३७ सेकंदात पार करत प्रथम क्रमांक मिळवला.

४२.१९५ किमीच्या या पूर्ण मॅरेथॉनमध्ये पुरुष गटात इथिओपियाचा मिको देरेजे अलेनू (२ तास २० मिनिटे ०९ सेकंद) दुसऱ्या स्थानावर राहिला, तर भारताच्या त्रिथा पुनने (२ तास २० मिनिटे १७ सेकंद) तिसरा क्रमांक पटकावला. महिलांच्या पूर्ण मॅरेथॉनमध्ये इथिओपियाची इडो टूलो (२ तास ४० मिनिटे ५६ सेकंद) दुसऱ्या स्थानी, तर इथिओपियाची वारे डेमिसी (२ तास ५० मिनिटे ४६ सेकंद) तिसऱ्या स्थानी राहिली. अर्ध मॅरेथॉन पुरुष गटात भारताच्या सचिन यादवने (१ तास ३.४३ सेकंद) प्रथम क्रमांक मिळवला. राज तिवारी (१ तास ३.४४ सेकंद) दुसऱ्या स्थानी, तर मुकेश कुमार (१ तास ४.३ सेकंद) तिसऱ्या स्थानी होते. महिलांच्या अर्ध मॅरेथॉनमध्ये भारताच्या भारती (१ तास १३.५९ सेकंद) हिने विजेतेपद पटकावले.

## इंटर मियामी संघाने प्रथमच एमआयसी विजेतेपद जिंकले

■ फोर्ट लॉडरडेल



**इंटर** मियामीने प्रथमच मेजर लीग सॉकर (एमआयसी) विजेतेपद जिंकले. या संघाने अंतिम सामन्यात व्हँकुव्हर व्हाईटकॅप्सला ३-१ ने हरवले. सामन्याची सुरुवात इंटर मियामीसाठी चांगली झाली. कारण ८ व्या मिनिटांत व्हँकुव्हरच्या चुकीमुळे एक ओन-गोल मिळाला आणि मियामी १-० ने आघाडीवर गेली.

दुसऱ्या हाफमध्ये व्हँकुव्हरने पुनरागमनाचा प्रयत्न केला आणि ६०व्या मिनिटाला बरोबरीचा गोल केला. पण त्यानंतर सामना पूर्णपणे इंटर मियामीच्या नियंत्रणात गेला. रोड्रिगो डी पॉलने ७२व्या मिनिटाला गोल करून इंटर मियामीची आघाडी दुप्पट केली आणि स्टॉपेज टाईममध्ये (९०+६) अलेनडेने गोल केला आणि इंटर मियामीने विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. अंतिम सामन्यातील उत्कृष्ट कामगिरीसाठी मेस्सीला मोस्ट व्हॅल्युएबल प्लेअर म्हणून निवडण्यात आले.

मेस्सीच्या कारकिर्दीतील ४८वी ट्रॉफी मेस्सीच्या कारकिर्दीतील ही ४८वी ट्रॉफी आहे. त्याने अर्जेंटिनाच्या संघासोबत ६ विजेतेपदे, बार्सिलोनासाठी उत्कृष्ट कामगिरी करत ३५ विजेतेपदे, पीएसजीसोबत ३ विजेतेपदे, आणि आता इंटर मियामीसोबत ४ ट्रॉफी जिंकल्या आहेत.

## गणपत भुवड संघाला विजेतेपद सदाशिव सातघरे संघ पराभूत

■ ठाणे

**ध्रुशील** हिरे, स्मित पोमेंडकरची अर्धशतकी खेळी आणि आयुष गोहे, तन्मय महासरियाच्या उपयुक्त गोलंदाजीमुळे मिळालेल्या पहिल्या डावातील ४० धावांच्या आघाडीच्या जोरावर गणपत भुवड संघाने सदाशिव सातघरे संघावर वर्चस्व मिळवत ठाणे फ्रेंड्स युनियन आयोजित १६ वर्षे वयोगटाच्या दुसऱ्या तुकाराम सुर्वे स्मृती दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. गणपत भुवड संघाने पहिल्या डावात १९५ धावा उभारत प्रतिस्पर्ध्यांना १५५ धावांवर रोखत संघाचा विजय निश्चित केला होता.

प्रथम फलंदाजी करताना ध्रुशीलने ५८, स्मितने ५० आणि यश धाबेने ३० धावा करत संघाला आव्हानात्मक धावसंख्या उभारुन दिली होती. या डावात आयुष सुर्वेने चार, रुद्र गिरीने तीन आणि आदित्य खेडेकरने दोन बळी मिळवले. उत्तरादाखल निरव भोरकरने ४६ आणि फलंदाजीत आपली छाप पाडताना आदित्य खेडेकरने ४३ धावा करत संघाला आश्वासक धावा करून दिल्या होत्या, पण इतर फलंदाज ढेपाळल्याने सदाशिव सातघरे संघाला दिड शतकी धावसंख्येवर समाधान मानावे लागले. आयुष गोहे आणि तन्मय महासरियाने प्रत्येकी तीन गडी बाद केले. प्रद्यान भोसलेने दोन बळी मिळवले.

## सात्रा, राजपूत, साळुंखे, चांडक, देसाई, सामंत विजेते

■ मुंबई

**मनोरा** बॅडमिंटन अकादमीच्या विद्यमाने नुकत्याच खार जिमखाना येथे आयोजित करण्यात आलेल्या ११८ व्या बॅडमिंटन स्पर्धेत पेहेर सात्रा, साऊजा राजपूत, आरोही साळुंखे, निवान डेनिस, अर्णा चांडक, अजिंक्य देसाई, रुद्रा गावडे, साईराज सामंत यांनी आपापल्या गटात विजेतेपदाचा मान मिळवला. राज्यातील विविध भागांतील २०० पेक्षा जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत भाग घेतला होता. योनेक्सचे सहकार्य स्पर्धेला लाभले होते. खार जिमखान्याचे अध्यक्ष गौरव कापाडिया, बॅडमिंटन विभागाचे चेअरमन भरत पारेख, सचिव देवांग दवे, आदित्य गोगटे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

## विजेतेपदासाठी मुलांच्या गटात धाराशिव-सोलापूर आमनेसामने



■ अहिल्यानगर

**महाराष्ट्र** खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने बुऱ्हाणनगरातील श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे सुरू झालेल्या ५१ वी मुले-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत अंतिम फेरीचा महामुकाबला निश्चित झाला असून, मुलांच्या गटात गतविजेत्या धाराशिव-सोलापूर आणि मुलींच्या गटात सांगली-ठाणे यांच्यात विजेतेपदासाठी अंतिम लढत होईल.

मुलींच्या पहिल्या उपांत्य सामन्यात गतविजेत्या धाराशिवला ठाण्याने ४०-२३ असा दणदणीत पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. त्यांनी मध्यंतरापासूनच सामन्यावर नियंत्रण ठेवत १६-१० अशी आघाडी घेतली होती. ठाण्याच्या विजयात अक्षरा भोसलेने १६ गुण व १.१० मिनिटे पळतीचा खेळ सादर करत सिंहाचा वाटा उचलला. दीक्षा काटेकर (१.१७ मि. संरक्षण व ६ गुण), वैष्णवी जाधव (१, १.५८ मि. संरक्षण व ६ गुण) यांनीही चमकदार खेळी करत विजय पक्का केला. पराभूत धाराशिवकडून मैथिली पवार (२.३० मि. व १० गुण) एकटीने निकराचा प्रतिकार केला, तर श्रावणी गुंड व दुर्गा भोसले यांनी प्रत्येकी ४ गुण वसूल केले, पण त्या आपल्या संघाला पराभवापासून वाचवू शकल्या नाहीत. मुलींच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात गत उपविजेत्या सांगलीने सोलापूरला २६-२३ असे १.५० मिनिटे राखून ३ गुणांनी हरवले. सांगलीकडून सानिया सुतार (१ मि. संरक्षण व ८ गुण) आणि सानिका चाफे (२.५०, नाबाद १.३० मि. संरक्षण व २ गुण) यांनी अष्टपैलू खेळी केली. तर पराभूत सोलापूरच्या स्नेहा लामकाने (२.५०, १ मि. संरक्षण व ८ गुण) व प्राजक्ता बनसोडे (१.३० मि. संरक्षण व ४ गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले.


मुलांच्या पहिल्या उपांत्य फेरीत सोलापूरने सांगलीला ३९-३८ असे एकाच गुणावर नमवित अंतिम फेरीत धडक मारली.

## ज्येष्ठ नाट्यकर्मी

# मोहनदास सुखटणकर

**मोहनदास सुखटणकर यांचे पणजोबा, आजोबा आणि वडील हे त्या काळातील प्रख्यात वैद्य. मोहनदास यांचे प्राथमिक आणि मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण माशेल आणि म्हापसा येथे झाले. म्हापशाच्या 'सारस्वत विद्यालय' या मराठी शाळेत इयत्ता दुसरीत शिकत असताना त्यांनी पहिल्यांदाच एका छोटया नाटुकलीत काम केले. त्या नाटुकलीचे नाव होते, 'खोडकर बंडू'. अभिनय येतो म्हणून नाही, तर वर्गात सतत बडबड करतो म्हणून, आरोंदेकर मास्तरांनी त्या नाटुकलीत काम करायची त्यांना शिक्षा केली होती. त्या नाटुकल्याच्या निमित्ताने मोहनदास सुखटणकरांच्या गालाला जो पहिल्यांदा रंग लागला तो कायमचा. नाटुकलीत खोडकर बंडूची प्रमुख भूमिका करून ज्या वेळी त्यांनी बक्षीस पटकावले, त्या वेळी प्रेक्षकांनी त्यांच्या धिटाईचे कौतुक केले.**

या नाटुकलीमुळेच सुखटणकरांना नाटकाची गोडी लागली. त्या निमित्ताने आपल्याला मुळातच अभिनयाची आवड होती याची जाणीवही त्यांना झाली.पुढे गोव्यात 'अँग्लो-पोर्तुगीज इन्स्टिटयूट' या हायस्कूलमध्ये शिकत असताना शाळेच्या वार्षिक संमेलनातून तीन ते चार वर्ष स्व-लिखित कोकणी प्रहसनांतून मोहनदासांनी विनोदी भूमिका साकारल्या व पारितोषिकेही मिळवली. तेव्हा अभिनयात करिअर करायचे आहे, असे काही त्यांच्या मनात नव्हते. पण छंद म्हणूनच सुखटणकर सारे करीत होते. त्यांच्या गांधीवादी विचारांच्या मामांचे एक सांगणे असायचे, आयुष्यात छंद जोपासावेत, पण मुख्य कामाकडे दुर्लक्ष करून नाही. मामांचे विचार त्यांच्यावर बिंबले ते कायमचे. त्यामुळे अभिनयाचा छंद जोपासताना सुखटणकरांनी शाळेच्या अभ्यासाची कधीही हेळसांड केली नाही. गावी मॅट्रिकच्या परीक्षेचे केंद्र नसल्याने १९५० मध्ये ते परीक्षेसाठी मुंबईला आले. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी नोकरीची शोधाशोध सुरू केली. 'बर्मा शेल' मध्ये लेखी परीक्षा व मुलाखतीत यशस्वी झाले, पण वैद्यकीय चाचणीत कमी वजन भरल्याने त्यांना नोकरी मिळाली नाही. बॅलार्ड पिअर येथून चर्चगेटला चालत निघाले असताना मुंबईत राहून काय करायचे, पुन्हा गोव्याला जाऊ या असा विचार त्यांच्या मनात घोळायला लागला. फ्लोरा फाउंटनजवळ ते आले असता एक गाडी थांबली. गाडीत 'इकॉनॉमिक टाइम्स'चे सहसंपादक डी. के. रांगणेकर होते. रांगणेकर कुटुंब मूळचे गोव्याचे असल्याने ते सुखटणकर कुटुंबीयांना ओळखत होते. विचारपूस झाल्यानंतर रांगणेकर यांनी त्यांना गाडीत बसायला सांगितले व त्यांना चष्म्याच्या काचा व फ्रेम बनविणाऱ्या 'मॉंटेक्स कॉर्पोरेशन' कंपनीच्या मालकांकडे घेऊन गेले. 'याला नोकरी द्या' अशी विनंती मालकाला केली. येथे 'टंकलेखक' म्हणून सुमारे सहा महिने त्यांनी नोकरी केली. १ एप्रिल १९५१ मध्ये 'ओरिएन्टल इन्शुरन्स' मध्ये ते 'लिपिक' म्हणून लागले आणि ३० नोव्हेंबर १९९० मध्ये महामंडळाच्या सेवेतून 'प्रसिद्धी अधिकारी' म्हणून निवृत्त झाले. नोकरी करत असताना ते जयहिंद महाविद्यालयातून 'अर्थशास्त्र' विषय घेऊन 'बी.ए.' झाले. महाविद्यालयाच्या पहिल्याच वर्षी डॉ. चारुशीला गुप्ते यांनी जयहिंद मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना करून सुखटणकरांना सचिव बनवले. या वाङ्मय मंडळांतर्गत विविध कार्यक्रम झाले.. महाविद्यालयाच्या वसतिगृहासाठी 'लग्नाची बेडी' हे नाटक करून मंडळाने निधी जमा केला. त्या नाटकात मोहनदास यांनी 'गोकर्ण'ची भूमिका साकारली होती. आत्माराम भेंडे, आशा भेंडे, बबन प्रभू ही व्यावसायिक रंगभूमीवर काम करणारी माणसेही त्यात होती. त्यानंतर सुखटणकर विविध एकांकिका स्पर्धांमधून भाग घेऊ लागले. त्यांनी एकांकिकांतून फक्त विनोदी भूमिकाच केल्या नाहीत, तर गंभीरही केल्या. 'वहिनी' या एकांकिकेत त्यांनी 'वल्लभ'ची गंभीर भूमिका रमाकांत देशपांडे यांच्या दिग्दर्शनाखाली साकारली. 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया'च्या स्पर्धेत चारुशीला गुप्ते यांच्या 'आम्ही सारेच वेडे'चा प्रयोग झाला. त्यात सुखटणकरांनी एका प्रौढाची विनोदी भूमिका वठवून उत्कृष्ट अभिनयासाठी असलेले पारितोषिक मिळवले. भारतीय विद्याभवनात 'आंतर महाविद्यालयीन नाट्यस्पर्धा' व्हायच्या. तिथे सुखटणकरांनी 'भाऊबंदकी'त काम केले आणि. गंगाधर गाडगीळांच्या 'वेडयांचा चौकोना'तही केले.. या दोन्ही नाटकांसाठी त्यांना बक्षीस मिळाले.१९५८ साली बी. ए. झाल्यावर मोहनदास सुखटणकर मुंबईतच 'गव्हर्नमेंट लॉ कॉलेज'मध्ये शिकू लागले.आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत या कॉलेजने सादर केलेल्या 'बळी' आणि 'लाल गुलाबाची भेट' या एकांकिकांसाठी त्यांना अभिनयाची प्रशस्तीपत्रके मिळाली. १९५९ साली महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत 'इंडियन नॅशनल थिएटर'ने 'अशीच एक रात्र येते' हे प्रा. प्रभाकर ताम्हाणे यांचे नाटक सादर केले. त्यात भय्यासाहेब वकील ही एक अत्यंत महत्त्वाची भूमिका मोहनदास सुखटणकरांनी वठवली. या नाटकात त्यांच्याबरोबर प्रसिद्ध लेखिका विजया पाटील यांनी काम केले होते, तर भय्यासाहेब वकिलाच्या मुलीची भूमिका मीनल मडकईकर यांनी केली होती. या नाटकाच्या प्रयोगाला 'दी गोवा हिंदू असोसिएशन'चे कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी सुखटणकरांनाला गाठून 'तू गोव्याचा. आमच्या संस्थेत तू असलंच पाहिजेस,' वगैरे गोष्टी सुनावल्या, आणि त्यांना 'दी गोवा हिंदू असोसिएशन'मध्ये घेतले. मोहनदास सुखटणकर यांच्या आयुष्यात आणि नाट्य़ प्रवासात 'धि गोवा हिंदू असोसिएशन'ला खूपच महत्त्वाचे स्थान आहे. या संस्थेत अगोदर त्यांनी कलाकार म्हणून प्रवेश केला आणि नंतर 'कार्यकर्ता' भूमिकेत वावरले.



संस्थेच्या बहुतेक नाटकांमधून मोहनदास सुखटणकर यांनी कामं केलीत. 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकात स्त्रीपात्र सोडून त्यांनी बहुतेक भूमिका साकारल्या. मोहनदास सुखटणकर यांनी चाळीस नाटकांमधून कामं केली आहेत. मत्स्यगंधा (चंडोल) , लेकुरे उदंड झाली (दासोपंत ), अखेरचा सवाल (हरिभाऊ), दुर्गी (मोरोबा नाडकर्णी), स्पर्श (नाटेकर), आभाळाचे रंग (आबा) ही काही त्यांची गाजलेली नाटकं. नाटकांप्रमाणेच त्यांनी 'कैवारी', 'जावई माझा भला', 'चांदणे शिंपीत जा', 'थोरली जाऊ', 'वाट पाहते पुनवेची', 'जन्मदाता', 'पोरका', 'प्रेमांकुर', 'निवडुंग' आदी मराठी चित्रपटांतही काम केले आहे. आकाशवाणी मुंबई केंद्रांवरील अनेक श्रुतिका, नभोनाट्य़ यातही ते सहभागी झाले. मुंबई दूरदर्शन केंद्रावरील विविध नाटके, 'गजरा' या कार्यक्रमात ते होते. 'दामिनी', 'बंदिनी', 'महाश्वेता' या त्यांच्या निवडक मराठी मालिका तर 'आनंदी गोपाळ', 'सिंहासन', 'नई दुनिया' या हिंदी मालिका. पण दूरचित्रवाहिन्यांवरील मालिकेत ते फारसे रमले नाहीत. नाटककार वि. वा. शिरवाडकर यांचा निकटचा सहवास त्यांना लाभला. शिरवाडकर यांचे मोठे ऋण आपल्यावर असल्याचे ते मानतात. शशी मेहता यांच्यासह सुखटणकर यांनी शिरवाडकर यांच्या नाटकातील स्वगते, कविता यांचा समावेश असलेला 'शब्दकळा कुसमाग्रजांच्या' हा कार्यक्रम सादर केला. कुसुमाग्रज यांच्या सूचनेवरूनच 'गोवा हिंदू'ने गोव्यात १९८१ 'स्नेहमंदिर' वृद्धाश्रम उभारला. रामकृष्ण नायक यांच्याबरोबर सुखटणकर यांचेही या कामात योगदान आहे. साहित्य, सांस्कृतिक, नाट्य़ क्षेत्रातील दिग्गजांचा सहवास त्यांना लाभला. पु. ल. देशपांडे, पं. भीमसेन जोशी, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, शंकर वैद्य, सुधीर मोघे, वसंत कानेटकर, भास्कर चंदावरकर, जयवंत दळवी, व. पु. काळे आदी मंडळी या ना त्या निमित्ताने अनेकदा त्यांच्या घरी आली होती. मोहनदास सुखटणकर यांना राजहंस प्रतिष्ठान' या संस्थेतर्फे देण्यात येणारा 'राजहंस पुरस्कार', नाट्यक्षेत्राची ५०हून अधिक वर्षे सेवा केल्याबद्दल मुंबईच्या 'आम्ही गोवेंकर' या प्रतिष्ठित संस्थेकडून जीवनगौरव पुरस्कार असे पुरस्कार मिळाले होते. मोहनदास सुखटणकर यांचे ६ डिसेंबर २०२२ रोजी निधन झाले.

---

## पालिका निवडणुकीसाठी युवक काँग्रेसचे प्रशिक्षण शिबीर

■ मुंबई

**आगामी** मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई युवक काँग्रेस अध्यक्ष झीनत शबरीन यांच्या नेतृत्वाखाली दादर टिळक भवनमध्ये एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर आयोजन करण्यात आले होते. निवडणूक व्यवस्थापन, महापालिका प्रशासन आणि माहिती अधिकार या महत्त्वाच्या विषयांवर यावेळी मान्यवर मार्गदर्शन केले. माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी पालिका व आरटीआयसंदर्भात माहिती दिली. प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस ड. संदेश कोंडविलकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रिया, आवश्यक अटी आणि काळजीपूर्वक पाळावयाच्या बाबींची माहिती दिली. माजी नगरसेवक आसिफ झकेरिया यांनी पालिकेची रचना, विभागनिहाय जबाबदाऱ्या आणि कामकाजाची पद्धत यावर विस्तृत प्रकाश टाकला.

## वसई-विरार पालिका निवडणूक शिवसेना-भाजपा एकत्र लढणार

**बैठकीत युतीवर शिक्कामोर्तब**

■ वसई

**पालघर** जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीत एकमेकांविरोधात लढणाऱ्या भाजपा आणि शिवसेनेने (शिंदे गट) आगामी वसई विरार महापालिका निवडणुका एकत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांच्या झालेल्या बैठकीत युतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. नुकत्याच झालेल्या पालघर जिल्ह्यातील ३ नगरपरिषदा आणि १ नगरपंचायत निवडणुकीत भाजपा आणि शिवसेना हे महायुतीचे घटक परस्परांविरोधात लढले होते. त्यामुळे वसई-विरार महापालिका निवडणुकीबाबत संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर विरारमध्ये दोन्ही पक्षांच्या नेत्यांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत आगामी महापालिका निवडणुकीसाठी युती करण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत भाजपचे आमदार राजन नाईक आणि शिवसेना शिंदे गटाचे आमदार विलास तरे, पालघर जिल्हाप्रमुखे वसंत चव्हाण, भाजपाच्या वसई विरार जिल्हाध्यक्षा प्रज्ञा पाटील उपस्थित होत्या. युती करणे ही प्राथमिकता होती. जागावाटपाबाबत नंतर निर्णय घेतला जाईल, असे शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष निलेश तेंडोलकर यांनी सांगितले. २०२५ मध्ये झालेल्या वसई-विरार महापालिकेच्या निवडणुकीत एकसंध शिवसेनेचे ५ नगरसेवक तर भाजपाचा एक नगरसेवक होता. शिवसेनेच्या विभाजनानंतर शिल्पा सिंग आणि स्वप्नील बांदेकर हे दोन नगरसेवक शिंदे गटात गेले. नगरसेविका प्रीती म्हात्रे बविआत गेल्या, तर धनंजय गावडे यांनी स्वत:चा पक्ष काढला आहे.

## तरुणाची स्वत:ला पेटवून आत्महत्या वाचवायला गेलेली पत्नी, भाचा जखमी

■ वसई

कर्जबाजारीपणामुळे नैराश्यात गेलेल्या एका तरुणाने स्वत:ला पेटवून आत्महत्या केली. त्याला वाचवायला गेलेली पत्नी आणि भाचा गंभीर जखमी झाले आहेत. विरारच्या फूलपाडा परिसरात काल मध्यरात्री ही घटना घडली.

विरार पूर्वेच्या फुलपाडा येथील मामा नगर परिसरात दीप प्लाझा ही इमारत आहे. या इमारतीच्या तळमजल्यावर अखिलेश विश्वकर्मा (३६) हा पत्नी आणि मुलांसह राहत होता. काल मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास त्याने बेडरूममध्ये स्वत:च्या अंगावर केरोसिन ओतून पेटवून घेतले. आगीचे लोट पाहताच त्याची पत्नी सुषमा (३२) आणि भाचा लक्ष्मिकांत (३०) वाचवायला गेले. दरम्यान, स्थानिकांनी अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशमन दलाने काही वेळेतच आगीवर नियंत्रण मिळवले. या आगीत अखिलेश विश्वकर्मा याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात पत्नी सुषमा किरकोळ जखमी झाली तर भाचा लक्ष्मीकांत हा गंभीर भाजला आहे. त्याला उपचारासाठी मुंबईच्या जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.


**PUBLIC NOTICE**

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION COMMERCIAL ARBITRATION PETITION NO. 140 OF 2024 ALONGWITH COMMERCIAL ARBITRATION PETITION NO. 141 OF 2024**

1. Jaysukh Nagjibhai Sapra
Indian Inhabitant, residing at 1601-02, Tower 3, Raheja Tipco Heights, Rani Sati Marg, Malad (East), Mumbai – 400 097.
2. Aruna Jaysukh Sapra
Indian Inhabitant, residing at 1601-02, Tower 3, Raheja Tipco Heights, Rani Sati Marg, Malad (East), Mumbai – 400 097.
3. JN Associates (HUF)
A Hindu Undivided Family
Having its office at 1601-02, Tower 3, Raheja Tipco Heights, Rani Sati Marg, Malad (East), Mumbai – 400 097.
)...Petitioners

*Versus*

1. Piramal Capital Housing Finance Ltd.
Formerly Dewan Housing Finance Corporation Ltd.
Having its registered office at Dhiraj Baug, Building A, Ground & First Floor, Beside Axis Bank, Opp. Monalisa Agra Road, Harniwas Circle, Naupada, Thane (West) – 400 062.
2. Mr. Rajen Dhruv
Propreitor of M/s. Orbit Ventures & Co.
Having its office at Sarkar Heritage, Jairabhoy Peerbhoy, Sanitorium Complex, Kane & B. J. Road, Bandstand, Bandra (West), Mumbai – 400 050. )
....Respondents

To the Respondent No. 2 above named, Whereas, the Petitioners above named have taken out an Application u/s. 34 of the Arbitration and Conciliation Act, 1996, thereby, challenging the ex-parte arbitral award dated 05.04.2022, thereby, praying to quash and set – aside the award dated 05.04.2022 and for such other and further reliefs as prayed in the said Petition.

You, the Respondent No. 2 viz. Mr. Rajen Dhruv are hereby warned to appear before the Hon'ble Bombay High Court before Hon'ble Justice Shri Sandeep V. Marne (or before the Hon'ble Judge having assignment of Arbitration Petitions at that point of time) situated at Fort, Mumbai – 400 001, in person or by authorised pleader duly instructed on the next date of hearing in Arbitration Petition No. 140/2024 i.e. 11 December 2025 to show cause against the Petition, failing wherein, the said Petition will be heard in your absence.


## कुणाल कामरा विरोधातील हक्कभंग प्रस्ताव समितीकडे तपासणीसाठी पाठवला

■ मुंबई

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांच्याविरुद्ध केलेल्या वक्तव्यामुळे स्टँड-अप कॉमेडियन कुणाल कामरा यांच्याविरुद्ध महाराष्ट्र विधान परिषदेने दाखल केलेला विशेषाधिकार भंग प्रस्ताव आता समितीकडे तपासणीसाठी पाठवला. याबाबत विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज माहिती दिली.

राम शिंदे म्हणाले की, कामरा यांच्याविरोधातील विशेषाधिकार भंग प्रस्ताव स्वीकारला आहे. हा प्रस्ताव समितीकडे पाठवला असून समिती तपास करून अहवाल देईल. त्यानंतर हा विषय सभागृहात चर्चेसाठी येईल.

मार्च महिन्यात कुणाल कामरा यांनी मुंबईतील खार येथील युनिकॉन्टिनेंटल हॉटेलमधील हॅबिटॅट कॉमेडी क्लबमध्ये सादरीकरण करताना एकनाथ शिंदे यांच्यावर टिप्पणी केली होती. कामरा यांनी शिंदे यांच्यावर गाण्याचे विडंबन करून टीका केली होती. त्याचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला होता. कामरा यांच्या टीकेमुळे शिंदे गटाचे पदाधिकारी संतापले. त्यानंतर शिंदेसेनेच्या राहुल कनाल आणि इतर ११ जणांनी हॅबिटॅट क्लबची तोडफोड केली होती.

## नाशिकमध्ये भाविकांच्या गाडीला अपघात! ५ ठार

■ नाशिक

**नाशिक** जिल्ह्यातील सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांवर काळाने घाला घातला. सप्तशृंगी गडावरून परतत असताना गणपती पॉइंटजवळ कार खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील पाच जणांना आपला जीव गमवावा लागला. कारमध्ये एकूण सात प्रवासी होते. भाविक देवीचे दर्शन घेऊन परतीच्या मार्गावर होते. दुपारी गणपती पॉइंटजवळ असताना, चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे कारने संरक्षक कठडा तोडला आणि थेट खोल दरीत कोसळली. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले.

## धारावी-भांडुप जल बोगद्यातून प्रक्रिया केलेले सांडपाणी नेणार

**सीआरझेडची मंजुरी**

■ मुंबई

**धारावी** सांडपाणी प्रक्रिया सुविधा मधून घाटकोपर मार्गे भांडुप वॉटर फिल्ट्रेशन प्लांटमध्ये प्रक्रिया केलेले पाणी वाहून नेण्यासाठी ८.४८ किमी आणि २.७ मीटर व्यासाच्या बोगद्यासाठी पालिकेला कोस्टल रेग्युलेटरी झोन (सीआरझेड) कडून मंजुरी मिळाली आहे. पर्यावरणीय मंजुरी मिळाल्यानंतर सुमारे ३,००० कोटी रुपये खर्चाच्या अंदाजे बांधकामाला सुरुवात होणार आहे. त्यासाठी जमिनीखाली १४५-१५० मीटर खोलीवर एक बोगदा बांधला जाईल, ज्याची कमाल खोली घाटकोपर येथे १५२ मीटर असेल. हा बोगदा ४१६ एमएलडी वाहून नेण्यासाठी तयार केला जाणार आहे. एका पालिका अधिकाऱ्याने सांगितले की शहरातील भविष्यातील पिण्याच्या पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी प्रक्रिया केलेले पाणी वापरता येऊ शकते. घाटकोपर एसटीपी आणि भांडुप कॉम्प्लेक्स दरम्यान प्रक्रिया केलेले पाणी फिल्टरेशन प्लांटमध्ये हस्तांतरित करण्यासाठी बोगद्याचा प्रस्ताव सप्टेंबर २०२४ मध्ये मंजूर करण्यात आला. सीआरझेड मंजुरी मिळाल्याने, मुंबईचे त्याचे बांधकाम पुढे जाऊ शकते. शहराच्या भविष्यातील पिण्याच्या पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठीदेखील प्रक्रिया केलेले पाणी वापरले जाऊ शकते. मुंबई शहर २,४६४ दशलक्ष लिटर प्रतिदिन (एमएलडी) सांडपाण्यावर प्रक्रिया करते.

## निर्माता विक्रम भट्टला अटक! ३० कोटींच्या फसवणुकीचा आरोप

■ मुंबई

**चित्रपट** निर्माता विक्रम भट्टला मुंबई आणि राजस्थान पोलिसांच्या संयुक्त पथकाने आज अटक केली. त्यांच्यावर उदयपूरमधील व्यापारी डॉ. अजय मुर्डिया यांची सुमारे ३० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. मुंबईतील यारी रोड परिसरातील गंगा भवन अपार्टमेंटमधील त्याच्या मेहुणीच्या घरातून त्याला अटक करण्यात आली. तक्रारदार डॉ. मुर्डिया यांनी सांगितले की, एका कार्यक्रमात त्यांची ओळख दिनेश कटारिया यांच्याशी झाली. कटारिया यांनी त्यांच्या पत्नीचा बायोपिक बनवण्याची कल्पना सांगितली. यासाठी विक्रम भट्टसोबत भेट घडवून आणली. २४ एप्रिल २०२४ रोजी मुंबईतील वृंदावन स्टुडिओमध्ये झालेल्या चर्चेनंतर दोन्ही पक्षांमध्ये बायोपिक आणि महाराणा या दोन चित्रपटांसाठी ४० कोटींचा करार झाला. त्यावेळी भट्ट यांनी चित्रपट निर्मितीची संपूर्ण जबाबदारी घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यातील ३० कोटी रुपये त्यांना दिले होते. या प्रकरणी उदयपूर पोलिसांनी गेल्या आठवड्यात विक्रम भट्ट, त्यांची पत्नी श्वेतांबरी इतर ६ जण अशा एकूण ८ आरोपींवर लुकआउट नोटीस जारी केली होती. ८ डिसेंबरपर्यंत पोलिसांसमोर हजर राहण्याचे निर्देश दिले होते. भट्ट यांनी स्पष्ट केले की, मला कोणतीही नोटीस मिळालेली नव्हती. पोलिसांची दिशाभूल केली जात आहे. मी फसवणूक केली असती, तर त्यांनी माझ्यासोबत तिसरा चित्रपट का सुरू केला? तक्रारदाराने तांत्रिक कर्मचाऱ्यांना पैसे दिले नव्हते म्हणून काम उशिरा होते. ३० वर्षांत असे कधीच घडले नाही. माझी बाजू सिद्ध करण्यासाठी माझ्याकडे ई-मेल व करारांचे पुरावे आहेत.

## मंगळवारी १५ तासांसाठी डोंबिवलीत पाणीपुरवठा बंद

■ डोंबिवली

**पाणीपुरवठा** व्यवस्थेच्या अत्यावश्यक देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांसाठी मंगळवारी ९ डिसेंबर रोजी डोंबिवली शहराचा पाणीपुरवठा तब्बल १५ तासांसाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी ९ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत डोंबिवलीचा संपूर्ण पाणीपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. उल्हास नदीतून पाणी उचलून नेतिवली येथील १५० दशलक्ष लिटर क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्रात ते शुद्ध केले जाते. या प्रक्रियेत महत्त्वाच्या असलेल्या फिल्टरबेड आऊटलेट पाईपलाईन बदलण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.


**जाहीर सूचना**

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)

**श्री. दिनेश अगरवाल, वैयक्तिक जामीनदार यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक जामीनदार (पीजी) चे नाव | **श्री. दिनेश अगरवाल** |
| २ | वैयक्तिक जामीनदाराच्या (पीजी) नोंदणीकृत कार्यालय/मुख्य कार्यालय/निवासाचा पत्ता | बंगलो क्र. २, वैष्णव सदन, विकाश क्लासिक सीएचएस, डॉ. सीजी रोड, चेंबूर, मुंबई ४०००७४ आणि सी-१७०२, पार्क ग्रॅण्डर बालेवाडी हाय स्ट्रीट, बाणेर, पुणे-४११०४५. |
| ३ | निर्णय प्राधिकरणाच्या आदेशाचा तपशील | माननीय एनसीएलटी यांनी सी.पी.(आयबी)/११९१/एमबी/२०२३ दिनांक ४ डिसेंबर, २०२५ मध्ये कॉर्पोरेट ऋणको (मे. श्री वैष्णव कास्टींग प्रायव्हेट लिमिटेड)चे वैयक्तिक जामीनदार श्री. दिनेश अगरवाल यांच्याविरुद्ध दिवाळखोरी ठराव प्रक्रिया स्वीकारली आहे. (आदेश दिनांक ०६ डिसेंबर, २०२५ रोजी प्राप्त) |
| ४ | आयबीसी अंतर्गत वैयक्तिक जामीनदाराच्या संदर्भात दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू होण्याचा दिनांक | दि. ४ डिसेंबर, २०२५ |
| ५ | ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्र. | श्री. बिरेंद्र कुमार अग्रवाल, नोंदणी क्रमांक: IBBI/IPA-001/IPP00564/2017-18/11040 |
| ६ | मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | १६०६, कॉर्पोरेट ॲनेक्स, सोनावाला लेन, उद्योग भवन जवळ, गोरेगाव पूर्व, मुंबई - ४०००६३, महाराष्ट्र. ईमेल : bk@bhamaconsulting.com |
| ७ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | १६०६, कॉर्पोरेट ॲनेक्स, सोनावाला लेन, उद्योग भवन जवळ, गोरेगाव पूर्व, मुंबई - ४०००६३, महाराष्ट्र. ईमेल : abhishek@bkacompany.com. संपर्क क्र. ८४४६६९२९८० |
| ८ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०१ जानेवारी, २०२६ |
| ९ | संबंधित अर्ज येथे उपलब्धः | वेबलिंकः https://ibbi.gov.in/en/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी श्री. दिनेश अगरवाल यांची कलम १०० अन्वये दि. ०४ डिसेंबर, २०२५ रोजी दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

श्री. दिनेश अगरवाल यांच्या धनकोंना, याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. १ जानेवारी, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी ठराव व्यावसायिकांना वरील नोंद क्र. ७ मध्ये उल्लेखित पत्त्यावर सादर करण्याची मागणी करण्यात येत आहे.

धनकोंनी त्यांचे पुराव्यासह दावे आणि वैयक्तिक माहिती इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाद्वारे किंवा कुरियर, स्पीड पोस्ट किंवा नोंदणीकृत पत्राद्वारे सादर करावे.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

**बिरेंद्र कुमार अग्रवाल**
**ठराव व्यावसायिक**
**IBBI/IPA-001/IPP00564/2017-18/11040**

**दिनांक: ०८.१२.२०२५**
**ठिकाण: मुंबई**


## विरोधी पक्षनेतेपदाचा प्रस्ताव मिळाला! राम शिंदेंची माहिती

■ नागपूर

**महाराष्ट्र** विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज त्यांच्या कार्यालयाला विरोधी पक्षनेत्याच्या नियुक्तीचा प्रस्ताव मिळाल्याची माहिती दिली. उद्यापासून विधान परिषदेचे हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर दरम्यान नागपूर येथे होणार आहे. विधान परिषदेचे अध्यक्ष राम शिंदे यांनी सांगितले की, जुलै २०२५ पासून विरोधी पक्षनेत्याचे पद रिक्त आहे. याबाबत सर्वांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे. या अधिवेशनात विरोधी पक्षनेतेची नियुक्ती झाली नाही तर दोन्ही सभागृहांमध्ये विरोधी पक्षनेतेपद रिक्त हे कदाचित राज्यातील पहिले हिवाळी अधिवेशन ठरेल.

## महाराष्ट्रासह विदर्भ, मराठवाड्यात गारठा वाढला! पारा १० अंशापर्यंत

■ मुंबई

महाराष्ट्रामध्ये गारठा वाढला असून विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात थंडीचा जोर जास्त आहे. काही ठिकाणी किमान तापमान १० ते १५ अंश सेल्सियसपर्यंत खाली घसरल्याने नागरिक कुडकुडले आहेत.हवामान विभागानुसार उत्तरेकडील थंड वारे आणि ढगाळ वातावरणामुळे ही थंडी वाढली असून पुढील काही दिवस गारठा कायम राहण्याची शक्यता आहे. विदर्भातील तीन जिल्ह्यांमध्ये थंडीची लाट कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. नागपूर, गोंदिया आणि यवतमाळला शीत लहरींचा अलर्ट आज देण्यात आला आहे. राज्याच्या इतर भागात किमान तापमान १२ ते १५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. एकुणच विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम-उत्तर महाराष्ट्रात थंडी मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, सोलापूर, जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांत सकाळचे तापमान १२ -१५ अंशांच्या दरम्यान नोंदवले जाईल. तसेच काही भागांत तापमानात आणखी घट होण्याची शक्यता आहे. विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात सकाळची तीव्र थंडी पुन्हा परतली आहे. काही जिल्ह्यांत किमान तापमान १० च्या खाली पोहोचत असून हिवाळ्याचा जोर अधिक जाणवू लागला आहे. हवामान विभागाने म्हटले आहे की, मुंबईसह संपूर्ण कोकण पट्ट्यात थंडीचा तडाखा वाढलेला आहे. मुंबईत पहाटे हलका गारवा जाणवेल. मुंबई शहराचे किमान तापमान अंदाजे १९ अंश सेल्सिअस तर कमाल तापमान ३० ते ३१ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

# दिसण्यापेक्षा 'असणं' महत्त्वाचं

**छोट्या** पडद्यावरील अभिनेत्री दीपिका कक्करने पहिल्यांदा स्वत:ला कर्करोग झाल्याचे सांगितले तेव्हा तिच्या कुटुंबियांपासून ते चाहत्यांपर्यंत सर्वांनीच तिच्या आरोग्यासाठी मनापासून प्रार्थना केली होती. आजही तिच्यावर उपचारांची प्रक्रिया सुरूच आहे. अलीकडेच त्यांनी 'कॅन्सरचे निदान झाल्याक्षणी रुहानसमोर मी कोसळले होते' असे सांगितले. रश्मी देसाई यांच्या पॉडकास्टमध्ये बोलताना दीपिका म्हणाली की, मला आजही तो दिवस आठवतोय. त्या दिवशी सर्व काही अचानक घडले. ज्या क्षणी मला कर्करोगाची शक्यता असल्याचे कळले, त्यावेळी मी रुहानला आईकडे सोपवले. कारण तो सतत रडत होता. मी त्याला नीट फीडही करू शकत नव्हते. त्या क्षणी मी पूर्णपणे ढासळले. मनातून आपसूकच एक प्रार्थना उमटली की जर हा खरोखरच कर्करोग असला तरीही मला कोणतीही तक्रार नाही. मी बरी होईन आणि मला ठाऊक आहे की देव मला यातून बाहेर काढेल,' असे ती सांगते.

दीपिका पुढे म्हणाली की, त्याक्षणी आम्ही खरोखरच विखुरलो होतो. कारण 'कर्करोग' हा शब्दच कोणाच्याही मनात भीती निर्माण करणारा आहे. त्यातही तो आपल्या स्वत:ला झाला असेल तर पायाखालची जमीन सरकते. त्यामुळे मी आणि शोएब दोघेही रडलो. परंतु त्यानंतर आम्ही ठरवले की आता रडायचे नाही. स्वत:तील बदलांबद्दल बोलताना दीपिका अत्यंत शांतपणे सांगते की, खरे सांगायचे झाल्यास या उपचारांमुळे मी पूर्वीइतकी सुंदर दिसणार नाही, माझे वजन वाढत आहे, केस गळत आहेत या सर्वांबाबत मला काहीही वाटत नाही. कारण मी तेव्हाच स्वत:ला सांगितले होते की, मी पुन्हा ठीक होईन आणि रुहानसाठी नव्याने उभी राहीन.'' काही महिन्यांपूर्वी दीपिकाला स्टेज-२ लिव्हर कर्करोगाचे निदान झाले आहे. जानेवारी महिन्यात एका मोठ्या शस्त्रक्रियेमध्ये तिच्या शरीरातून ट्यूमर काढण्यात आला होता.




# 'लालो'चा कमाई विक्रम




**राजकुमार** राव आणि श्रद्धा कपूर यांच्या स्त्री-२ ने हिंदी चित्रपटसृष्टीत विक्रमी कमाई करत ८५७ कोटी रुपयांचा जागतिक महसूल मिळवला होता. मात्र, 'लालो : श्री कृष्ण सदा सहायते' या गुजराती चित्रपटाने हा विक्रम मागे टाकत देशातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक म्हणून स्थान मिळवले आहे. प्रदर्शनानंतर आठ आठवड्यांनी भारतीय बॉक्स ऑफिसवरील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट म्हणून 'लालो'ने आपल्या नावाची नोंद केली आहे. गुजराती चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सार्वकालिक उच्चांकी कमाई करणारा चित्रपट बनला आहे. १० ऑक्टोबर रोजी जेव्हा हा चित्रपट प्रदर्शित झाला, तेव्हा त्याची कमाई फक्त दोन लाख रुपयांपर्यंत सीमित होती. परंतु प्रेक्षकांच्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे या चित्रपटाने अक्षरश: दिवसागणिक झपाट्याने वाढ केली. आज तब्बल ५६ दिवसांनी अनेक ठिकाणी थिएटरमध्ये हा चित्रपट हाऊसफुल्ल होत आहे. देशांतर्गत १०३ कोटी रुपयांची कमाई तर जागतिक स्तरावर १०९.५ कोटी रुपयांचा आकडा ओलांडत या चित्रपटाने इतिहास घडवला आहे. इंडस्ट्री ट्रॅकर सॅकनिल्कच्या आकडेवारीनुसार, आठव्या आठवड्यात सर्वाधिक कमाई करणारा हा देशातील पहिला चित्रपट ठरला आहे. 'लालो'ने या कालावधीत ९.०५ कोटी रुपये कमावले. यापूर्वी हा विक्रम स्त्री २ च्या नावावर होता. या चित्रपटाने ४.५५ कोटी रुपयांची कमाई केली होती. याचबरोबर 'लालो'ने विक्की कौशलच्या 'छावा' (४.१० कोटी) आणि अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' (२.८५ कोटी) यांनाही मागे टाकले आहे. 'लालो'च्या निर्मितीसाठीच्या खर्चाचा विचार करता आपल्या गुंतवणुकीच्या जवळपास २१,८०० टक्क्यांहून अधिक नफा मिळवला आहे. यापूर्वी सर्वाधिक कमाई करणाऱ्या गुजराती चित्रपटांमध्ये 'चाल जीवि लाइये' हा चित्रपट अग्रस्थानी होता. या चित्रपटाने सुमारे ५० कोटी रुपयांचे संकलन केले होते.

# परिस्थिती प्रतिकूल होती; पण...

**बॉलिवूडमधील** प्रमुख कलाकारांपैकी एक असलेले आमिर खान यांनी अलीकडील संवादामध्ये कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातील संघर्षाचा वेध घेतला. एका कार्यक्रमात बोलताना आमिर यांनी अनेक कठीण प्रसंगांना उजाळा दिला. त्यांनी सांगितले की, १९७३ मधील 'यादों की बारात'पासून सुरू झालेली अभिनययात्रा 'कयामत से कयामत तक'च्या प्रचंड यशापर्यंत पोहोचली. मात्र



आणि कलागुणांना धरून नाहीये. आमिर सांगतात की, या अवस्थेचा मानसिक परिणाम इतका तीव्र झाला की, मी संध्याकाळी घरी परतल्यानंतर डोळ्यातून अश्रू यायचे. तेव्हाच मी स्वत:शी ठाम पणे प्रतिज्ञा केली की, दिग्दर्शकावर विश्वास नसेल, कथानक मनाला भिडणारे नसेल आणि निर्माता सक्षम नसेल तर काम स्वीकारायचे नाही. साठीत पोहोचलेले आमिर पुढे सांगतात की, 'सर्वात प्रतिकूल टप्प्यावर' सुद्धा तडजोड न केल्याची जाणीव मला प्रचंड मानसिक बळ देऊन गेली. महेश भट्ट यांच्या चित्रपटाची ऑफर मिळाली तेव्हा परिस्थिती अत्यंत प्रतिकूल होती, तरीही कथानक पटले नाही म्हणून मी थेट नकार दिला. हीच कृती माझ्यासाठी निर्णायक ठरली. सर्वात अवघड काळातही मी तडजोड केली नाही, ही गोष्टच मला पुढे नेणारी शक्ती ठरली,'' असे ते म्हणाले. थोडक्यात, या मुलाखतीमधून त्यांनी आपल्या परेफ्शनिस्ट बनण्याचं गुपितच उलगडून सांगितलं.

त्यानंतरही कोणत्याही प्रतिष्ठित दिग्दर्शकाने संधी द्यावी अशी परिस्थिती नव्हती. अनेक चित्रपटांच्या ऑफर्स येत होत्या, पण ज्या दिग्दर्शकांसोबत काम करण्याची माझी इच्छा होती, त्यांच्यापैकी कोणीच मला विचारत नव्हते. तुम्ही खऱ्या अर्थाने 'प्रस्थापित स्टार' झाल्याशिवाय ए-ग्रेड दिग्दर्शक तुमच्याशी काम करण्यास तयार होत नाहीत, हे वास्तवही त्यांनी सांगितले. या संघर्षाच्या काळात आमिर यांनी एकाच वेळी आठ–नऊ चित्रपटांना होकार देण्याची चूकही केली होती. त्यांना वाटले की, सर्व कामे एकत्र पार पाडता येतील; पण एकाचवेळी शूटिंग सुरू होताच त्यांना जाणवले की, अशी विस्कळीत कामगिरी त्यांच्या स्वभावाला

# 'फेक' कचराफेक

**बॉलिवूड** अभिनेत्री आणि खासदार कंगना रनौत यांच्यावर अलीकडे वाराणसीच्या रस्त्यांवर कचरा टाकल्याचा आरोप करण्यात आला होता आणि त्याची बरीचशी चर्चाही झाली होती. कंगना वाराणसीत स्थानिक स्ट्रीट फूडची चव घेण्यासाठी एका टिक्कीच्या स्टॉलवर गेल्या होत्या. त्यानंतर काही सोशल मीडिया पोस्ट्समध्ये दावा करण्यात आला की, त्यांनी खाणे झाल्यावर वापरलेली प्लेट रस्त्यावर फेकून दिली. मात्र, कंगनाने तत्काळ या आरोपांना उत्तर दिले असून संपूर्ण प्रकरणावर प्रकाश टाकला आहे. कंगनाने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर त्या स्टॉलवरील फोटो शेअर केला आहे. त्या फोटोत त्यांनी स्वत: असलेल्या जागेच्या अगदी शेजारी असलेला कचरापेटीचा भाग ॲरोने दर्शविला आहे. डस्टबिनमध्ये नीट ठेवलेल्या वापरलेल्या पेपर प्लेट्स स्पष्टपणे दिसत आहेत. कंगनाने सांगितले की, त्यांनीही आपली प्लेट डस्टबिनमध्येच टाकली असून, रस्त्यावर कचरा फेकल्याचा आरोप पूर्णपणे खोटा आहे. आपल्या पोस्टमध्ये त्यांनी असेही लिहिले की, खोट्या गोष्टी प्रसिद्ध करण्यापूर्वी किमान तथ्यांची पडताळणी तरी करावी. या पोस्टच्या माध्यमातून कंगनाने सोशल मीडियावर फिरणाऱ्या खोट्या प्रचाराला थेट उत्तर दिले आहे. तिच्या चाहत्यांनीही या स्पष्टोक्तीला पसंती दिली असून, अफवा पसरवणाऱ्यांचा समाचार घेतला आहे.



# 'ब्रँड' अहानचा करिष्मा



**'सैयारा'** या चित्रपटातून लक्ष वेधून घेणाऱ्या अहान पांडेची हार्ले-डेव्हिडसन इंडियाने आपल्या ब्रँड अम्बेसेडर म्हणून घोषणा केली आहे. यामुळे त्याच्या अभिनय कारकिर्दीला एक नवे वळण प्राप्त झाले आहे. जागतिक स्तरावर अत्यंत नामांकित असणाऱ्या या मोटरसायकल ब्रँडने इतक्या लवकर एका नवोदित कलाकारावर विश्वास टाकणे ही उल्लेखनीय घटना समजली जात आहे. मात्र उद्योगजगताच्या दृष्टीने ही निवड अत्यंत सुयोग्य ठरते. कारण युवा पिढीत झपाट्याने प्रसिद्धी मिळवणाऱ्या अहानची प्रतिमा आणि हार्ले-डेव्हिडसनचा आधुनिकतेकडे झुकणारा स्वभाव यांची जुळवाजुळव सहज घडते. हार्ले-डेव्हिडसनने ही घोषणा करताना कंपनीने 'एक्स४४० टी' हे नवे मॉडेलही सादर केले आहे. अहान पांडेच्या व्यक्तिमत्त्वात झळकणारी शैली, आत्मविश्वास आणि नवोन्मेषाकडे झुकणारा स्वभाव हार्ले-डेव्हिडसनला अपेक्षित असलेल्या युवा रायडर समुदायाशी थेट जुळतो, असे कंपनीचे म्हणणे आहे.

हेल्दी Me

## हेल्दी टिप्स



दालचिनी अन्नपदार्थांचा स्वाद वाढवण्यासाठी वापरली जातेच; पण त्याचबरोबर टाईप–२–मधुमेहींच्या शरीरातील रक्तशर्करेत होणारे चढ–उतार ते नियंत्रित करते. नियमितपणे अर्धा चमचा दालचिनी पावडरचे सकाळी अनशापोटी सेवन केल्यास रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी नियमित राहते आणि सिरम ट्रायग्लीसेराईड देखील कमी होते. यामध्ये ॲण्टीबायोटिक आणि सूज कमी करणारे गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या वेदनांमध्ये आराम मिळतो.



दोन किंवा तीन वेलची चर्वण केल्यास सर्दी पडसे, ॲसिडीटी, छातीतील जळजळ, बद्धकोष्ठता या आजारात आराम मिळतो. वेलदोड्यांमुळे किडनीतील टाकाऊ पदार्थ बाहेर टाकले जातात आणि यामुळे तापासारख्या आजारातही आराम मिळतो. मुखदुर्गंधी घालवण्यासोबत वेलची तोंडातील अल्सरची शक्यता देखील दूर करते.

# समस्या ॲलर्जिक ऱ्हायनायटिसची



ॲलर्जिक ऱ्हायनायटिस ही श्वसनसंस्थेशी निगडीत एक सामान्य पण त्रासदायक ॲलर्जीजन्य समस्या आहे. हवेत असणारे परागकण, धूळकण, बुरशीचे कण, पाळीव प्राण्यांचे केस, कपड्यांतील सूक्ष्म धागे किंवा सुगंधी रसायनांचा वास हे सर्व घटक ॲलर्जेन म्हणून कार्य करतात. जेव्हा हे ॲलर्जेन नाक अथवा तोंडावाटे शरीरात प्रवेश करतात तेव्हा रोगप्रतिकारक यंत्रणा हिस्टामिन नावाचे द्रव्य स्रवते. यामुळे नाकाच्या आतील आवरणात सूज येते, ग्रंथी उत्तेजित होतात आणि शिंका येणे, नाक वाहणे, डोळ्यांत व घशात खाज येणे, कधी कधी त्वचेवर लालसर चट्टे दिसणे अशी लक्षणे प्रकट होतात. ॲलर्जिक ऱ्हायनायटिस संसर्गजन्य नसतो. सामान्य सर्दीप्रमाणे तो जीवाणू किंवा विषाणूमुळे होत नाही तर शरीरातील रोगप्रतिकारक यंत्रणेची अतिसंवेदनशील प्रतिक्रिया यात कारणीभूत असते. काहीवेळा नॉन ॲलर्जिक ऱ्हायनायटिससुद्धा आढळतो. या दोन्हींमध्ये समान लक्षणे दिसतात. परंतु त्यामागे ॲलर्जेन नसतो. या आजाराचे दोन प्रकार मानले जातात. पहिला म्हणजे हंगामी ॲलर्जी जी विशिष्ट ऋतूमध्ये दिसते. उदा. पावसाळ्यात किंवा पिक कापणीच्या काळात परागकण वाढल्यावर ही तक्रार होते. दुसरा प्रकार म्हणजे वर्षभर राहणारी ॲलर्जी जी प्रामुख्याने घरातील धूळकण, आर्द्र हवामान, पाळीव प्राणी किंवा काही खाद्यपदार्थ यामुळे उद्भवते.

**प्रमुख कारणे**

कुटुंबामध्ये पूर्वीपासून ॲलर्जी किंवा दम्याचा त्रास असणे, अतिप्रदूषित किंवा दमट ठिकाणी राहणे, वायुवीजन कमी असलेल्या जागेत जास्त वेळ घालवणे. यामुळे ॲलर्जिक ऱ्हायनायटिस होण्याची शक्यता वाढते.

**घरगुती सजगता :** बिछाना, उशी व चादरी आठवड्यातून दोनदा धुऊन उन्हात वाळवणे, घरातील हवेशीरपणा टिकवणे, धूळ व धूर टाळणे, एअरकंडिशनर व कूलर नियमित स्वच्छ ठेवणे, धुळीच्या ठिकाणी जाताना मुखपट्टी लावणे, अगरबत्ती व धूपबत्तीच्या धुरापासून दूर राहणे हे उपाय साधे असले तरी प्रभावी ठरतात. ॲलर्जी दीर्घकाळ राहिली तर नाकामध्ये पॉलिप्स निर्माण होऊ शकतात. तसेच दम्याचा त्रास वाढणे, ब्राँकायटिस, सतत श्वास घेण्यास त्रास होणे, फंगल सायनसाइटिस होणे यासारख्या गुंतागुंतीही उद्भवू शकतात. त्यामुळे या आजाराकडे दुर्लक्ष करू नये.

# अश्वगंधा झोपेवरही गुणकारी

अश्वगंधा ही प्राचीन काळापासून ओळखली जाणारी औषधी वनस्पती असून, तिचे आयुर्वेदिक उपचार पद्धतीत विशेष महत्त्व आहे. भारत व आफ्रिकेच्या काही भागांमध्ये आढळणाऱ्या या वनस्पतीमध्ये विशेषतः विथॅनोलाईड्स, सॅपोनिन्स व अल्कलॉइड्स या घटकांचा समावेश होतो. आयुर्वेदात अश्वगंधेचा वापर ताण कमी करण्यासाठी, झोप सुधारण्यासाठी व शरीराला सामर्थ्य देण्यासाठी केला जातो.

ताण व झोप यांचा संबंध समजून घेणे आवश्यक आहे. जेव्हा शरीर सतत तणावाखाली असते तेव्हा कॉर्टिसोल नावाचे हार्मोन अधिक प्रमाणात स्रवते. या वाढलेल्या हार्मोनमुळे मन अस्वस्थ होते, झोप येण्यास अडथळा निर्माण होतो किंवा वारंवार झोपमोड होते.



त्यामुळे निद्रानाश, थकवा व बेचैनी वाढते. अशा परिस्थितीत अश्वगंधाचे सेवन अतिशय उपयुक्त ठरते. यातील गुणकारी घटक कॉर्टिसोलचे प्रमाण नियंत्रित करण्यास मदत करतात आणि मनाला शांतता मिळवून देतात. परिणामी, झोप गाढ लागते व झोपेची गुणवत्ता सुधारते. क्युरियस आणि इतर संशोधनात असे दिसून आले आहे की, अश्वगंधा शरीराला ताणाशी लढण्यासाठी सक्षम करते व मनात शांततेची भावना निर्माण करते. 'प्लॉस वन' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासात सहभागी झालेल्या व्यक्तींनी अश्वगंधा सेवनानंतर झोपेची गुणवत्ता व दैनंदिन आरोग्य सुधारल्याचे सांगितले. त्यांच्यात निद्रानाशाचे प्रमाण कमी झाले व दिवसभराचा थकवा कमी जाणवला.

आणखी एका अभ्यासात झोप येण्यास लागणारा वेळही कमी झाल्याचे दिसले. अश्वगंधाचे फायदे अनेक असले तरी कोणत्याही परिस्थितीत तिचे सेवन

## उपचारपद्धती

करण्यापूर्वी वैद्यांचा, तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. कारण निद्रानाशावरील गोळ्या किंवा थायरॉईडच्या औषधांसोबत, तिचा परस्पर परिणाम होऊ शकतो.

(डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत.)

# चुकीचे रक्त दिल्यास...

रक्तदानाला महादान असे म्हटले जात असले तरी रक्त देताना काही वैद्यकीय निकष पाळावे लागतात. यामध्ये रुग्णाला त्याच रक्तगटाचे रक्त देणे अत्यावश्यक असते आणि ते पूर्णपणे सुसंगत आहे की नाही हे तपासणे सर्वात महत्त्वाचे मानले जाते. चुकीचा रक्तगट असणारे रक्त देण्यात आले तर रुग्णाच्या जीवाला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. चुकीचे रक्त दिल्यास शरीरात हिमोलिटिक ट्रान्सफ्यूजन रिॲक्शन होऊ शकते. शरीरातील रोगप्रतिकारक यंत्रणा परके रक्त 'धोकादायक' मानते आणि त्यावर हल्ला करते. अशावेळी शरीरात अनेक त्रासदायक



लक्षणे दिसू लागतात. यात ताप येणे, थंडी वाजणे, पाठीमध्ये वेदना होणे, त्वचेवर लालसरपणा किंवा जळजळ दिसणे, श्वास घेण्यास त्रास होणे, उलटी होणे तसेच लघवीत रक्त येणे अशी चिन्हे दिसतात. ही लक्षणे रक्त दिल्यानंतर लगेच किंवा काही वेळाने प्रकट होऊ शकतात. काही वेळा ही प्रतिक्रिया अत्यंत गंभीर स्वरूप धारण करते. वैद्यकीय भाषेत डिसेमिनेटेड इन्ट्राव्हॅस्क्युलर कोअग्युलेशन अशी अवस्था निर्माण होऊ शकते, ज्यात शरीरात रक्ताच्या गुठळ्या तयार होतात आणि नंतर मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव होऊ लागतो. इतकेच नव्हे तर किडनी निकामी होणे, रक्तदाब अचानक खाली जाणे आणि हृदयविकारासारखी जीवघेणी स्थितीही उद्भवू शकते. म्हणूनच रक्त चढवण्याआधी नेहमीच क्रॉस–मॅचिंग आणि रक्तगट सुसंगतता तपासणी केली जाते. रुग्णालयांमध्ये यासाठी खास प्रयोगशाळा चाचण्या केल्या जातात. यामुळे रुग्णाला त्याच्या शरीरासाठी सुरक्षित आणि योग्य रक्त मिळेल याची खात्री केली जाते. यामध्ये थोडीशीही बेपर्वाई जीवघेणी ठरू शकते. त्यामुळे प्रत्येक टप्प्यावर काटेकोर तपासणी आणि दक्षता घेणे अत्यावश्यक असते.


सिमंधर महानारायण वात बाम
एक प्रभावी उपाय
अकडन कंबर दुखी
सांधे दुखी पाठ दुखी
To Order Scan Here
Simandhar
HELPLINE NO .: 7045355632

# मोस सर्जरीच्या अंतरंगात...

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी त्वचेवरील कर्करोगी गाठी काढून टाकण्यासाठी मोस शस्त्रक्रिया करून घेतली आहे. कपाळावर केली गेलेली ही शस्त्रक्रिया जोपर्यंत एकही कर्करोगी पेशी उरत नाही तोवर केली जाते.

या शस्त्रक्रियेचे नाव तिचे जनक डॉ. फ्रेडरिक ई. मोस यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. बेसल सेल कार्सिनोमा, स्क्वॅमस सेल कार्सिनोमा, मेलेनोमा आणि इतर दुर्मीळ प्रकारच्या त्वचेच्या कर्करोगासाठी ही पद्धत वापरली जाते. याला सूक्ष्मदर्शकीय शस्त्रक्रिया असेही म्हटले जाते. यात त्वचेचे थर काढून त्यांची सूक्ष्मदर्शकाखाली तपासणी केली जाते. सर्व कर्करोगी पेशी पूर्णपणे नष्ट झाल्याची खात्री झाल्यावरच प्रक्रिया थांबते. या मार्गाने शक्य तितके निरोगी ऊतक वाचवले जाते.

या पद्धतीमुळे रुग्णावर अतिरिक्त उपचारांची गरज कमी पडते. ही पद्धत जोखमीच्या त्वचेच्या कर्करोगासाठी सर्वाधिक उपयुक्त मानली जाते. कारण या उपचाराचा सक्सेस रेट जवळपास ९९ टक्के आहे. या शस्त्रक्रियेची शिफारस विशिष्ट स्थितींमध्ये केली जाते.




✻ पुन:पुन्हा परत येणारा किंवा आधीच्या उपचारानंतर पुन्हा उद्भवलेला कर्करोग.

✻ मोठ्या आकाराचा, वेगाने वाढणारा किंवा अस्पष्ट कडा असलेला कर्करोग. ✻ डोळ्यांच्या भोवती, कान, नाक, तोंड, हात, पाय किंवा जननेंद्रियांसारख्या ठिकाणी झालेला कर्करोग, जिथे निरोगी ऊतक जपणे अत्यावश्यक असते. ही साधारणपणे बाह्यरुग्ण शस्त्रक्रिया असते आणि चार तासांच्या आत पूर्ण होते.


**शस्त्रक्रियेची प्रक्रिया**

लोकल ॲनेस्थेशिया औषध देऊन त्वचा सुन्न केल्यानंतर शल्यविशारद दिसणारा कर्करोग आणि त्याच्या आजूबाजूचा पातळ थर काढतात. यानंतर हे ऊतक प्रयोगशाळेत नेऊन सूक्ष्मदर्शकाखाली तपासले जाते. शल्यविशारद काढलेल्या जागेचा नकाशा तयार करतात. त्यामुळे जर कर्करोगी पेशी दिसल्या तर नक्की कुठल्या भागात पुढील थर काढायचा हे ठरते.

मेलेनोमा या प्रकारातील पेशी उघड्या डोळ्यांनी दिसण्यापेक्षा जास्त आत पसरलेल्या असू शकतात. जर त्या तशाच राहिल्या तर कर्करोग खोलवर जाऊन लसिकाग्रंथीपर्यंत पोहोचू शकतो. तपासणीत अधिक प्रमाणात कर्करोग आढळला तर पुन्हा थर काढून तपासणी केली जाते. जोवर कोणतीही कर्करोगग्रस्त पेशी आढळत नाही तोवर ही प्रक्रिया केली जाते. या प्रक्रियेनंतर जखम भरून काढण्यासाठी टाके, त्वचेचे प्रत्यारोपण किंवा जखम नैसर्गिकरित्या भरू देणे असे पर्याय असतात. या पद्धतीचा एक मोठा फायदा म्हणजे तत्काळ परिणाम दिसतात.

बहुतेक रुग्णांना काही दिवस सौम्य वेदना होतात. मात्र टाके किंवा व्रण पूर्ण बरे होण्यासाठी १२ ते १८ महिने लागू शकतात.

# नवाकाळ शब्दकोडे-१४५४



**आडवे शब्द –**

३. पीठ मळण्यासाठीची कान असलेली लाकडी परात ६. सुकामेव्यातील एक ८. पारितोषिक ११. अलेक्झांडरचे भारतीय नाव १४. भांडकुदळ स्त्री १६. माकड १७. ऊबदार पांघरूण १९. खूप धावल्यावर दम लागणे २०. लांब पल्ल्याची तलवार २१. पुन्हा पुन्हा २३. पोपट २४. वाहने थांबण्याची जागा, स्टेशन २५. मनाई २८. पीडा, त्रास ३०. दोन बोटांचे माप ३२. प्रिय स्त्री ३३. खडबडीत ३८. तपासणारा, परीक्षा घेणारा ३९. धागा, स्रोत ४०. बाण, तीर ४१. रामायणातील आरंभीचा भाग ४३. रात्री चमकणारा कीटक ४४. रव्याचा न्याहारीतला पदार्थ ४५. चातुर्य, शहाणपण ४७. होऊन गेलेले ४९. झिंक ५०. खांद्यातला सांधा ५१. सुज्ञ, बुद्धिमान ५२. शासन, दंड ५३. कडक भाषेतील टीका ५४. वजा, कमी ५५. बंगला, घर ५७. मराठी तिसरा महिना ५८. गावाची सीमा ५९. प्राप्ती, फायदा ६१. भांडकुदळ स्त्री ६३. वजनदार ६४. अखंड कागद ६५. विष्णूच्या मंदिराबाहेरील द्वाररक्षकांच्या मूर्ती ६८. उभे पीक, गावाभोवतीची मोकळी जागा ७०. खळबळ माजवणारे ७२. खंदक ७३. घोळका, गर्दी ७५. लग्नातला हा विधी वधूपित्याकडून केला जातो. ७६. शिरा, उपमा, लाडू यातील एक घटक ७८. शस्त्राची मूठ ७९. झुकलेला ८०. विष्णूचा दुसरा अवतार ८१. मोठे ८३. पौष्टिक तेलबियांचा प्रकार ८५. मस्तक ८६. फेरफार ८८. इतर ठिकाणी ९०. किंचित अंश ९१. दात, दंत ९३. मृग ९४. जाळे विणणारा कीटक ९५. लढवय्या ९७. दिवा ९८. खडकांतील, डोंगरांतील भेग, खबदड, दरड १००. माज १०१. घर, सदन १०३. आहुती, यज्ञात टाकलेले १०४. दाण्याचे साल १०६. टंचाई १०७. सुदैवी १०९. दिमाख ११०. कासोटा १११. इंग्रजी सहावा महिना ११२. अंगीकार, पतकर

**उभे शब्द –**

१. तलवारीची धार २. सूड ४. गुंड ५. रायगडावरचा प्रसिद्ध कडा ७. खूप मोठा ७. शंकराचे वाद्य ८. पैशांची थैली ९. शेतातील पिकांचा गाळसाळ १०. जमीन १२. लकवा १३. पाषाण १५. अतिरिक्त १८. दहशत २०. नागरिक २२. एक अप्सरा २४. कायमचा राहणारा २६. मूर्ख २७. चणचण, उणीव २९. तांबडी छटा, रक्तिमा ३१. कार्यक्रमाची सांगता होणे ३२. सावधगिरी ३३. पोटदुखीवर घरगुती उपाय ३४. मुत्सद्दी ३५. झाकण असलेले पात्र ३६. आसपास कोणी नसलेल्या ठिकाणी राहणे ३७. सरोवरातील हाउस बोट ३९. दुसरा, द्वितीय ४२. तुळई ४४. दक्षिणी आमटी ४५. भरवशाचा आव आणणारा ४६. रामाचे एक गुरू ४८. मोठेपणाचा तोरा ५०. लज्जत ५४. पाण्यात व जमिनीवर असा दोन्हीकडे वावरणारा प्राणी ५६. धीर, उत्साह, बळ ५७. सत्तावीसपैकी अठरावे नक्षत्र ५८. खुळचट ५९. संकोच, शरम ६०. बिछाना ६२. व्यभिचार ६३. माणसे, लोक ६४. झोपडीचे दार ६६. आसन ग्रहण केलेला ६७. याग ६८. पवित्र ६९. उदासीनता, स्वारस्य नसणे ७१. नामांकित ७४. मोठेपणा, महत्त्व ७७. नोकर, गुलाम ७८. पळून गेलेला ८०. इंग्रजीत थंड ८२. शब्द, बोलणे ८४. अंकित, अधीन ३६. मजबूत ८८. भाजीपाला वगैरेत आढळणारा क्षुद्र कीटक ८९. तेरावी तिथी ९२. एजंट ९३. गज, कुंजर ९४. शुष्क ९६. अधःपात ९७. केसांची लट ९९. अग्नी १००. चिंतन १०१. मदतीसाठी देवाला मारलेली हाक १०२. स्वच्छंदी, छांदिष्ट १०३. चलाख १०४. छायाचित्र १०५. मजल, टप्पा १०६. हीन, क्षुद्र १०८. डाग, काळिमा •

**नवाकाळ कोडे क्रमांक १४५३ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. पहिलवान ६. नीहार ८. केविलवाणा ११. गोषवारा १२. वटवाघुळ १३. जटायू १४. गळा १५. ठाऊक १७. कंचनी १९. रजत २२. साईल २४. सरबत २६. ठक २८. खाच २९. वर्णी ३१. वाजतगाजत ३५. दादला ३६. हजरजवाबी ३९. नरोटी ४१. हीर ४३. पान ४४. हावरा ४६. व्यायाम ४८. विधू ५०. लगट ५२. समाधी ५४. हवा ५६. अचानक ५७. उत्तर ५८. संभव ५९. शीर्षक ६०. रहदारी ६१. अलबत ६३. समा ६५. कडा ६६. दणका ६८. हय ६९. क्षतज ७०. मुबलक ७२. सरकार ७५. साम्य ७६. दही ७७. वचक ७८. वश ७९. काकणभर ८१. झिंग ८२. पाणथळ ८४. कोनाडा ८५. वखार ८७. बटीक ८९. पाप ९०. असा ९१. सावली ९३. खास ९५. जानकी ९७. काडी ९८. उपसागर ९९. अनामिका १०१. वर १०२. गुर्मी १०३. मार १०४. नाकबूल १०५. धारदार १०६. वासरू १०७. सैन्य १०८. कोरड १०९. काबू ११०. तथ्य

**उभे शब्द** : १. रोषणाई २. पराठा ३. लवकर ४. वाट ५. नवागत ६. नीळकंठ ७. रजनी ८. केयूर ९. लगत १०. वाळा १६. ऊस १८. चकवा २०. जहाज २१. पंचवटी २२. साबुदाणा २३. लवलाही २५. बधीर २७. श्रुत ३०. दावानल ३२. जमाव ३३. गाय ३४. तनया ३७. जत्रा ३८. जपा ४०. रोमहर्षक ४२. रविकर ४४. हाट ४५. रासभ ४६. व्याधी ४७. पाचारण ४९. उत्तरीय ५१. गफलत ५३. मावसबहीण ५५. वाकडातिकडा ५७. उदाहरण ५८. संत ६१. अक्षम्य ६२. बजरंगबली ६४. माल ६६. दटावणी ६७. कास ७०. मुदपाकखाना ७१. कवळ ७३. रकाना ७४. काकडा ७५. सारखा ८०. भवसागर ८३. थक्क ८४. कोप ८६. रसा ८८. अनवरत ८९. पाडी ९०. असामान्य ९२. वरकड ९४. समिधा ९६. कीर ९७. कालवा ९८. उर्मी ९९. अलका १००. कारळे १०२. गुरू १०४. नार

# दिग्दर्शक शेखर कपूर



**हिंदी सिनेसृष्टीतले अत्यंत संवेदनशील दिग्दर्शक शेखर कपूर यांचा जन्म ६ डिसेंबर १९४५ रोजी झाला. शेखर कपूर हे हिंदी सिनेसृष्टीतले अत्यंत संवेदनशील दिग्दर्शक म्हणून ओळखले जातात. शेखर कपूर यांच्या नावावर तसे एका हाताच्या बोटांवर मोजता येतील इतकेही सिनेमे नाहीत. त्यांनी केलेल्या सिनेमांपेक्षा अर्धवट राहिलेल्या सिनेमांचीच यादी मोठी होऊ शकते. तरीही शेखर कपूर भारतातल्या फार मोठ्या दिग्दर्शकांपैकी एक आहेत आणि पुढेही असतील.**

**शेखर** कपूर खरं तर देव आनंद यांचे भाचा. घरच्यांनी त्यांना सिनेमापासून दूर ठेवण्याचा खूप प्रयत्न केला. त्या काळात सी.ए बनून त्यांनी मल्टीनॅशनल कंपन्यांमधे काम केलं. पण सिनेमाने त्यांना भारतात खेचून आणलं. दूरदर्शनच्या सुवर्णकाळात ते अभिनेता म्हणूनही गाजले. त्यांनी मासूम हा सिनेमा दिग्दर्शित करत हिंदी सिनेसृष्टीत



पाऊल ठेवले. त्याआधी त्यांनी दिग्दर्शित केलेली खानदान ही मालिका चांगलीच गाजली. मासूम हा सिनेमा केल्यानंतर त्यांनी मिस्टर इंडिया हा सिनेमाही दिग्दर्शित केला. बँडिट क्वीन हा फूलन देवीच्या आयुष्यावर आधारित सिनेमाही त्यांनी दिग्दर्शित केला आहे. तर आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्यांनी एलिझाबेथ, द फोअर फिदर्स, एलिझाबेथ द गोल्डन एज, न्यूयॉर्क आय लव्ह यू आणि पॅसेज यांसारखे सिनेमा दिग्दर्शित केले आहेत.

शेखर कपूर हे सध्या एलिझाबेथ सीरिजमधला तिसरा पार्ट तयार करत आहेत. एलिझाबेथ द डार्क एज असं या सिनेमाचं नाव आहे. सुशांत सिंह राजपूत या अभिनेत्याच्या आत्महत्येनंतर त्यांनी त्यांच्या आगामी पानी सिनेमाबद्दलही त्यांनी लिहिलं होतं. पानी सिनेमात सुशांतची प्रमुख भूमिका होती. हा सिनेमा यशराज तर्फे आणण्यात येणार होता. मात्र शेखर कपूर आणि आदित्य चोप्रा यांच्यात झालेल्या मतभेदांमुळे हा सिनेमा शेखर कपूर यांनी सोडला. ज्यानंतर सुशांत निराश झाला होता माझ्या खांद्यावर डोकं ठेवून तो खूप रडला होता या आशयाची काही ट्विट्स शेखर कपूर यांनी केली होती. त्यामुळे ते सुशांत सिंह राजपूतच्या आत्महत्येनंतर चर्चेत आले होते. सप्टेंबर २०२० मध्ये एफटीआयआयच्या अध्यक्षपदी आणि एफटीआयआय गव्हर्निंग कौन्सिलचे चेअरमन म्हणून शेखर कपूर यांची निवड झाली आहे. केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने या संदर्भातली घोषणा केली आहे.

३ मार्च २०२३ पर्यंत शेखर कपूर यांचा कालावधी असेल असंही जाहीर करण्यात आलं आहे. शेखर कपूर यांनी अभिनेत्री सुचित्रा कृष्णमूर्ती सोबत लग्न केले होते.

# मालाड - कुर्ल्यात ५० टक्के मतदार वाढले

■ मुंबई

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या तोंडावर जाहीर झालेल्या प्रारूप मतदार यादीत मोठी आणि असमान वाढ-घट झाली आहे. काही वॉर्डमध्ये मतदारसंख्या तब्बल ५० टक्के पेक्षा जास्त वाढली. तर दक्षिण मुंबईतील २४ वॉर्डमध्ये मतदारसंख्या कमी झाली आहे.

मतदार यादीच्या अधिकृत आकडेवारीनुसार, २०१७ नंतर संपूर्ण मुंबईमध्ये मतदारांच्या संख्येत एकूण १२.६७ टक्क्यांनी वाढ नोंदवली. मात्र प्रत्येक प्रभागात ही वाढ वेगवेगळी नोंदवली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार चार वॉर्डमध्ये सर्वाधिक वाढ झाली आहे. यामध्ये वॉर्ड ४८ - मालवणीत २०१७ मध्ये २९ हजार ६९७ मतदार होते. ते आता ४९ हजार ७७५ झाले आहेत. म्हणजे त्यात तब्बल ६७.६ टक्के वाढ झाली, वॉर्ड ३३ - मालाड-मढ येथील मतदार २५ हजार ५९० वरून ३९ हजार ४२४ झाले आहेत. म्हणजे ५४.१ टक्के वाढ झाली. वॉर्ड १६३ - मध्य मुंबईत ३० हजार ९२६ वरून ४६ हजार ९४१ अशी ५१.८ टक्के वाढ झाली.वॉर्ड १५७ - कुर्ला परिसरात ३८ हजार १९८ वरून ५७ हजार ६१२ अशी ५०.८ टक्के वाढ झाली. तर दक्षिण मुंबईत काळबादेवी, चिराबाजार, भुलेश्वर, गिरगाव परिसर येथे येथे अनेक जुन्या इमारती पुनर्विकासासाठी रिकाम्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कुटुंबे उपनगर किंवा ठाणे, नवी मुंबईकडे स्थलांतरित झाली आहेत. त्याचा थेट परिणाम मतदारयादीवर झाल्याची माहिती आहे.

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाची घरे रिक्त करा! रहिवाशांना नोटिसा

■ मुंबई

**उपनगरात** शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाने बांधलेल्या संक्रमण शिबिराच्या इमारतीत राहणाऱ्या अंदाजे ६५० रहिवाशांना खोल्या रिक्त करण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत. यामुळे रहिवाशांत एकच खळबळ उडाली आहे.

शासन अंगीकृत असलेल्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्प अंतर्गत उपनगराच्या विविध भागात संक्रमण शिबिराच्या ८ ते १० इमारती बांधलेल्या आहेत. यामध्ये वर्षानुवर्षे रहिवाशी राहात आहेत. या रहिवाशांवर गेल्या महिन्यांपासून येथील खोल्या रिक्त करण्यच्या नोटिसांचा संधित कार्यालयाकडून वर्षाव होऊ लागल्याने रहिवाशांवर बेघर होण्याची वेळ आली आहे.

या संदर्भात शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयातील एका अधिकाऱ्याला विचारले असता, त्यांनी वरील माहितीला दुजोरा देत सांगितले की, सहा खासगी विकासकांनी आपल्या एसआरए प्रकल्पातील रहिवाशांना आमच्या संक्रमण शिबिरातील खोल्या तात्पुरत्या स्वरुपात राहावयास दिली आहेत. मात्र या विकासकांनी गेले अनेक वर्षापासून खोल्यांचे भाडे थकविले आहे. त्यासाठी विकासक व त्यांचे भाडेकरू या दोघांवर नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

# पाप लपवण्यासाठीच विरोधी पक्षनेते पद दिले जात नाही

पान १ वरून

घेऊन सरकारवर टीका केली. विजय वडेट्टीवार म्हणाले की, काँग्रेसच्या राजवटीत कोणतेही संविधानिक पद कधी रिक्त ठेवले गेले नाही. पण या सरकारला विरोधकांची भीती आहे. त्यांना मनमानी कारभार करायचा आहे. दोन्ही पदे रिक्त ठेवून विरोधकांना चहापानाला बोलावणे म्हणजे केवळ दिखावा. त्यामुळे आम्ही बहिष्काराचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात दररोज सहा ते सात शेतकरी आत्महत्या करत आहेत. कर्जमाफीचे आश्वासन देऊन मते घेतली, पण आता तारीख पे तारीख दिली जात आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा पत्ता नाही. राज्यात १८ वर्षांखालील मुली असुरक्षित आहेत. 'लाडकी बहीण' योजनेचे गोडवे गात असलेले सरकार प्रत्यक्षात तिच्या सुरक्षेकडे पूर्णतः दुर्लक्ष करत आहे.

# शताब्दी रुग्णालयात अस्वच्छता खासदार पियुष गोयल आक्रमक

■ मुंबई

कांदिवली पश्चिमेतील मुंबई महापालिकेच्या मालकीच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर (शताब्दी) रुग्णालयातील अस्वच्छता पाहून केंद्रीय मंत्री आणि स्थानिक खासदार पियुष गोयल आक्रमक झाले. त्यांनी थेट मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांना फोन लावून या रुग्णालयाबाबत चर्चा केली. या रुग्णालयातील साफसफाई करणाऱ्या जुन्या कंत्राटदाराला तत्काळ बदला, असा आदेश पियुष गोयल यांनी गगराणी यांना दिला.



जानेवारी महिन्यात मुंबई महापालिकेची निवडणूक होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पियुष गोयल यांनी शताब्दी रुग्णालयाला भेट घेऊन तिथली पाहणी केली. रुग्णालयातील अस्वच्छता पाहून आक्रमक झालेल्या पियुष गोयल यांनी आयुक्त भूषण गगराणी यांना फोन करून सांगितले की, रुग्णालयात योग्य साफसफाई होत नाही. त्यामुळे कंत्राटदार बदला. दर ७ दिवसांत रुग्णालयाची स्वच्छता आणि सॅनिटायझेशन करावे. मी पुढच्या रविवारी ग्णालयामध्ये पाहणीसाठी पुन्हा येणार आहे.

# जळगावात शिंदे आमदाराकडून स्ट्राँग रूमबाहेर खासगी सुरक्षा

पान १ वरून

विशेष जागरूक आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपा वगळता काँग्रेस, अजित पवार गट, उबाठा व शिंदेसेना सर्व पक्षांचे कार्यकर्ते पहारा देत आहेत. दोन दिवसांपूर्वी स्ट्राँग रूमबाहेर तैनात असलेल्या पोलिसांची बदली झाली. हे पोलीस त्यांच्या साहित्याच्या पेट्या घेऊन बदलीच्या ठिकाणी निघाले असता त्यांच्यावर ईव्हीएम मशीन बाहेर घेऊन जात असल्याचा संशय आला. त्यानंतर पोलिसांच्या बॅग तपासण्यात आल्या. मात्र पोलिसांच्या बॅगमध्ये काहीही आक्षेपार्ह सापडले नाही.

एरंडोल येथे स्ट्राँग रूमच्या बाहेर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेराचा डिस्प्ले अडीच तासापर्यंत बंद पडल्याचा प्रकारही उघड झाला होता. याबाबत एरंडोल नगरपरिषद निवडणुकीतील उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी शंका उपस्थित करत निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदारांकडे लेखी तक्रार केली. तर धरणगावमध्ये विरोधी पक्षांचे कार्यकर्ते स्वतःच स्ट्राँग रूमच्या बाहेर पहारा देत आहेत.

# गोव्याच्या नाईट क्लबमध्ये अग्नितांडव २५ जणांचा मृत्यू! चौकशीचे आदेश

पान १ वरून

अटक केली आहे. मात्र मालक फरार आहे. ही आग सिलिंडरच्या स्फोटामुळे लागल्याचे सांगितले जात होते. परंतु मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी ही आग क्लबमध्ये सुरू असलेल्या आतिषबाजीमुळे लागल्याचे सांगितले.

काही प्रत्यक्षदर्शींनी असा दावा केला की, क्लबच्या पहिल्या मजल्यावर पर्यटक नाचत होते तिथे प्रथम आग लागली. त्यांनतर ज्वाळा वेगाने पसरल्या आणि क्लबच्या बहुतेक प्रत्येक भागाला आगीने वेढा दिला. रात्री उशिरा घटनास्थळाला मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी भेट दिली. त्यावेळी बोलताना ते म्हणाले की, मृत्यू झालेल्यांमध्ये बहुतेक स्वयंपाकघरातील कर्मचारी आणि पर्यटक होते. त्यात तीन महिलांचाही मृत्यू झाला आहे. घटनेसंदर्भात नाईट क्लबचा मालक आणि महाव्यवस्थापकांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक अहवालावरून असे दिसून येते की, नाईट क्लबने अग्निसुरक्षा नियमांचे पालन केले नव्हते. बाहेर पडण्यासाठी एकच दरवाजा होता. सुरक्षा नियमांचे उल्लंघन करूनही क्लबला काम करण्यास परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर आम्ही कारवाई करू, असे सावंत म्हणाले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनेबाबत दुःख व्यक्त केले. त्यांनी म्हटले आहे की, उत्तर गोवा जिल्ह्यातील आगीच्या दुर्दैवी घटनेत जीवितहानी झाल्याचे तीव्र दुःख झाले आहे. शोकाकूल कुटुंबाबद्दल मी मनापासून सहानुभूती व्यक्त करत आहे. या कठीण काळात त्यांना शक्ती मिळो. जखमी लवकर बरे होतील यासाठी मी प्रार्थना करते.

# इंडिगोचा गोंधळ अदानीच्या फायद्यासाठी?

पान १ वरून

यावी, असे निर्देश देण्यात आले होते. मात्र, इंडिगोने शेवटपर्यंत याबाबत कोणतेही पाऊल उचलले नाही. १० तासांच्या कामाचा अवधी ८ तास करण्यात आला. त्यामुळे मनुष्यबळाची अचानक कमतरता निर्माण झाली. परिणामी इंडिगोच्या उड्डाणावर अचानक ताण वाढल्याने गोंधळ उडाला. त्यामुळे सरकारला याची गंभीर दखल घेत तत्काळ काही आदेश द्यावे लागले. आता 'फ्लाईट ड्युटी, टाईम लिमिटेशन' नियमांना फेब्रुवारीपर्यंत स्थगिती देण्यात आली आहे.

मुरलीधर मोहोळ पुढे म्हणाले की, नागरी विमान वाहतूक महासंचालक (डीजीसीए)कडून इंडिगोच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी डीजीसीएने चार सदस्यांची समिती नेमली आहे. चार सदस्यांच्या समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. आम्ही पहिल्या दिवसापासून सांगितले होते की, हा अतिशय बेजबाबदारपणा आहे. समितीने चौकशी केल्यानंतर जी काही माहिती समोर येईल, त्यानुसार कारवाई होईल. इतर विमान कंपन्यांनी वाढविलेले दर कमी करण्यास आम्ही सांगितले आहे. शिवाय भरपाई देण्यास लगेच सुरुवात करावी, असेही निर्देश दिले आहेत.

# वैमानिक-कर्मचाऱ्यांचा सतत अपमान इंडिगो वैमानिकाचे खुले निनावी पत्र

■ नवी दिल्ली

**इंडिगोच्या** एका वैमानिकाचे खुले निनावी पत्र व्हायरल झाले आहे. या पत्रात म्हटले आहे की, इंडिगोमध्ये झालेली घसरण ही एका दिवसात झालेली नाही. तर या घसरणीचा पाया अनेक वर्षे रचला जात होता. कर्मचाऱ्यांचा सतत अपमान केला जात होता.

या वैमानिकाने पत्रात म्हटले आहे की, २००६ मध्ये इंडिगोची स्थापना झाली. सुरुवातीला कंपनीने चांगली प्रगती केली. मात्र सन्मान आणि अहंकार यातली धूसर सीमा न लक्षात आल्याने हे कधीतरी होणारच होते. कंपनीच्या मंडळाने जेव्हा अनुभव नसलेल्या आणि योग्यता नसलेल्या लोकांना मोठ्या पदांवर बसवले, तेव्हाच प्रगतीचा आलेख कोसळणार हे स्पष्ट झाले होते. त्यांच्याकडे कंपनी चालवण्याची समजही नव्हती आणि कुठलाही विशेष गुणही नव्हता. पुढे हा वैमानिक म्हणतो, इंडिगोचे वैमानिक असोत किंवा कर्मचारी, त्यांचा थकवा, त्यांची सुरक्षा, त्यांच्या कामांचे तास या सगळ्याकडे सातत्याने दुर्लक्ष झाले. थकवा येतो किंवा कामाचे तास वाढल्याचे सांगणाऱ्या वैमानिकांना ऑफिसमध्ये अपमानित करण्यात आले.




नवाकाळ
• पुणे । सोमवार ८ डिसेंबर, २०२५ • पान -८

## रायगड जिल्ह्यातील तळगडावर गुप्त दरवाजा



**तळा -** रायगड जिल्ह्यातील तळा शहरातील ऐतिहासिक तळगड नावाच्या किल्ल्यावर शिवकालीन गुप्त दरवाजा सापडला आहे. येथील दुर्गरत्न प्रतिष्ठानमार्फत स्वच्छता मोहीम राबवली जात असताना हा गुप्त दरवाजा सापडला आहे. हा गुप्त दरवाजा सापडल्यानंतर येथे शिवप्रेमींनी विधीवत पूजा करीत जल्लोष साजरा केला. १६४८ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी हा तळगड आदिलशहाकडून जिंकला होता. त्यानंतर १६५९ साली अफजलखानाच्या स्वारीच्यावेळी सिद्दीने या तळगडाला वेढा दिला. अभ्यासकांकडून गडाची माहिती, नकाशा घेत या प्रतिष्ठानच्या शिवभक्तांनी फावडे, टिकाव, पहारी हाती घेऊन हा गुप्त दरवाजा शोधून काढला.

## कामाटीपुरा पुनर्विकास प्रकल्प

# दक्षिण मुंबईचा चेहरामोहरा बदलेल

**समीर करंबे**

**एकेकाळी बदनाम असलेल्या मुंबईतील कामाठीपुरा परिसराचा पुनर्विकास होत आहे. या पुनर्विकासानंतर येथील रहिवाशांना पाचशे चौरस फुटांची घरे मोफत मिळणार आहेत. हा प्रकल्प दक्षिण मुंबईचा चेहरामोहरा बदलेल, असे प्रकल्पासाठी सातत्याने प्रयत्न करणारे मुंबादेवीचे आमदार अमीन पटेल यांचे म्हणणे आहे. त्यांच्याशी केलेली ही बातचीत -**

आ. अमीन पटेल



**कामाठीपुरा परिसराबद्दल थोडे सांगा...**

- ब्रिटिशांच्या काळात मुंबईची जडणघडण होत होती, तेव्हा अनेक मोठ्या इमारती बांधल्या जात होत्या. या कामासाठी त्यावेळी या आजच्या तेलंगणामधून बांधकाम मजूर येथे आले. त्यांना कामाठी म्हणत असल्याने या विभागाला कामाठीपुरा असे नाव पडले. मात्र, नंतर इथे शरीरविक्रयाचा व्यवसाय सुरू झाल्याने हा भाग बदनाम झाला. एकेकाळी इथले शरीरविक्रय करणाऱ्या महिलांची संख्या २५,००० होती. मात्र, शंभर वर्षांत ही ओळख पुसली गेली आहे. अत्यंत दाटीवाटीचा असा हा एकूण ३६ एकरचा हा परिसर आहे. इथे एकूण १५ गल्ल्या आहेत. त्यात एकूण ८०० इमारती आहेत. ६,६२५ रहिवासी आहेत. उद्योग व्यावसायिक १,३७६ आहेत. इतर धरले तर एकूण संख्या ८,६८९ इतकी आहे. त्यात मोठ्या प्रमाणावर भाडेकरू आहेत. बहुतेक इमारती शंभर वर्षांहून अधिक जुन्या आणि उपकरप्राप्त आहेत. इथे सगळ्या जातीधर्मांचे लोक राहतात. हा परिसर म्हणजे मिनी इंडिया आहे.

**कामाठीपुराचा पुनर्विकास करण्याची गरज का निर्माण झाली?**

- इथल्या अनेक इमारती शंभर वर्षांहून जुन्या असल्याने जीर्ण झाल्या आहेत. त्यांची सतत दुरुस्ती करावी लागते. शिवाय इथली घरे अतिशय लहान आहेत. अगदी ५०-६० चौरस फुटांच्या घरात लोक राहतात. त्यामुळे अनेक जण घराबाहेर झोपतात. मुंबईत सर्वत्र पुनर्विकास होत असल्याने इथल्या लोकांचेही मोठ्या घरांचे स्वप्न होते. यासाठीच पुनर्विकासाची मागणी गेल्या १५ वर्षांपासून होत होती.

**हा प्रकल्प मंजूर व्हायला इतकी वर्षे का लागली?**

- २००७ मध्ये कामाठीपुराच्या पुनर्विकासासंदर्भात पहिली बैठक झाली होती. या बैठकीत कामाठीपुराच्या पुनर्विकासासंदर्भात बरीच चर्चा झाली. त्यावेळी मी इथला नगरसेवक होतो. त्यावेळचे आमदार सचिन अहिरही बैठकीला उपस्थित होते. या बैठकीमुळे सुरुवात झाली. मात्र अनेक अडथळे होते. इथे ८०० इमारती असल्या तरी इथल्या जमीनमालकांची संख्या ६८८ इतकी आहे. यातले बहुतेक मालक स्वतःच इथले




रहिवासीही आहेत. त्यांची कुठली संघटना नव्हती. ते वैयक्तिकरित्या किंवा छोटे गट करून विकासकांकडे जात होते. मात्र, त्यांना कमी जागा देऊन विकासक त्यांची बोळवण करत होते. शिवाय या परिसराचा एकत्र विकास करायला कुणी रस दाखवत नव्हते. अखेर २०१२ मध्ये कामाठीपुरा लँडलॉर्ड वेल्फेअर असोसिएशनची स्थापना करण्यात आली. त्यानंतर जमीनमालक एकत्र येऊन विकासकांकडे जाऊ लागले. मी पहिल्या दिवसांपासून त्यांच्यासोबत होतो. परंतु फारसे काही निष्पन्न होत नव्हते. त्यानंतर बऱ्याच बैठका झाल्या. दरम्यान, गृहनिर्माणची धोरणे बदलत गेली. मुंबईतील रहिवाशांना पुनर्विकासात मिळणारा एफएसआय वाढत गेला. २०२० मध्ये फेब्रुवारी महिन्यात कोरोना येण्याच्या आधी तेव्हाचे गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड, गृहनिर्माण सचिव संजय कुमार, म्हाडाचे मिलिंद म्हैसकर यांनी कामाठीपुराचा एक आढावा घेतला. दरम्यानच्या काळात आम्ही या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यासाठी एका प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नियुक्ती केली. आम्ही असा निर्णय घेतला होता की, पुनर्विकासात इथल्या ५० चौरस मीटर जागा असलेल्या मालकाला ५०० स्क्वेअर फुटाची दोन घरे मिळावीत. १०० स्क्वेअर मीटरची जागा असल्यास त्याला ५०० स्क्वेअर फुटांचे दोन फ्लॅट मिळावेत. तर प्रत्येक भाडेकरूला ५०० स्क्वेअर फुटांचा फ्लॅट मिळायला हवा. पण विकासक याला तयार होत नव्हते. मग आम्ही जितेंद्र आव्हाड यांना एक पत्र लिहून या प्रकल्पात म्हाडा ही नोडल एजन्सी असावी, अशी मागणी केली. आम्ही आमच्या घराची चावी म्हाडाला देणार आणि त्यांच्याकडूनच नव्या घराची चावी घेणार, असे आम्ही त्यांना सांगितले. पण म्हाडा नोडल बनल्यानंतरही प्रकल्प वेगाने पुढे सरकत नव्हता. कारण या प्रकल्पात जमीनमालकांना, भाडेकरूंना, म्हाडाला आणि विकासकाला असा सगळ्यांनाच समाधानकारक हिस्सा मिळणे आवश्यक होते. अखेरीस म्हाडाने या प्रकल्पासाठी टेंडर मागवली. दोन विकासकांनी निविदा भरल्या. त्यातील गोयल कन्स्ट्रक्शनची निविदा पात्र ठरली आहे. विकासकाने आमच्या अटीशर्ती मान्य केल्या.

**या प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे?**

- म्हाडाने विकासकाच्या टेंडरला मंजुरी दिली आहे. सरकारने नेमलेल्या उच्चस्तरीय समितीनेही टेंडर मंजूर केले आहे. गृहनिर्माण खात्याचे सचिव या समितीचे प्रमुख आहेत. तर म्हाडाचे उपाध्यक्ष सदस्य आहेत. आता या टेंडरला फक्त गृहनिर्माण मंत्र्यांची मंजुरी बाकी आहे. ते त्यांच्याकडे पाठवले आहे. त्यांची लवकर मंजुरी मिळेल, अशी आशा आहे. केवळ एक पायरी आम्ही दूर आहोत.

**इथल्या रहिवाशांना नेमकी किती जागा मिळणार आहे?**

- कामाठीपुराच्या प्रकल्पाला आम्ही आठ क्लस्टरमध्ये विभागले आहे, यात एकूण १७ इमारती उभ्या राहणार आहेत. त्यातील ९ इमारती कामाठीपुरातील रहिवाशांना मिळणार आहेत. त्या प्रत्येकी ५० माळ्यांच्या असतील. आम्ही केलेल्या मागणीनुसार, इथल्या रहिवाशांना ५०० स्क्वेअर फुटांचे घर मिळणार आहे. प्रत्येक रहिवाशाला पाच लाखांचा कॉर्पस फंड मिळणार आहे. दर महिन्याला २५,००० रुपयांचे भाडे दिले जाणार आहे. ते नंतर वाढेलही. पार्किंग, उद्यान, मैदान, शाळा, समाज हॉल असे सगळे काही रहिवाशांना मिळणार आहे. त्यामुळे ते समाधानी आहेत. त्यांना डबल बेडरूम घर मोफत मिळणार आहे. त्यांचा १४ वर्षांचा वनवास संपणार आहे. म्हाडाला ४ लाख स्क्वेअर फूट जागा मिळणार आहे. म्हाडा त्यांना मिळालेली घरे परवडणारी योजनेसाठी देणार आहे. त्यांचे मूल्य १,६०० कोटी असेल. २ कमर्शियल कॉम्प्लेक्स आणि १ हॉटेल असेल. विकासकाचाही मोठा फायदा होणार आहे.

**हा प्रकल्प कधी पूर्ण होणार? लोकांना घरे कधी मिळणार?**

- आठ-दहा दिवसांत वर्क ऑर्डर निघण्याची शक्यता आहे. त्यानंतर लवकरात लवकर काम सुरू होईल. आधी २,००० रहिवाशांचे स्थलांतर केले जाईल. त्यानंतर जी इमारत बांधून तयार होईल. त्यात ३,५०० रहिवाशांना घरे मिळतील. त्यामुळे प्रकल्प पूर्ण होईपर्यंत जास्त रहिवाशांना स्थलांतर करावे लागणार नाही. प्रकल्प सुरू झाल्यापासून चार वर्षांत पहिले घर मिळेल, अशी अपेक्षा आहे. संपूर्ण प्रकल्प पूर्ण व्हायला सात-आठ वर्षे लागतील, असा अंदाज आहे.

**या पुनर्विकासामुळे दक्षिण मुंबईचा चेहरामोहरा कसा बदलेल?**

- निश्चितच या प्रकल्पामुळे दक्षिण मुंबईचा कायापालट होईल. कारण दक्षिण मुंबईतील हा सर्वात मोठा पुनर्विकास प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे जुन्या इमारती जाऊन नव्या गगनचुंबी इमारती उभ्या राहतील. जुन्या घराऐवजी इथल्या रहिवाशांना अत्याधुनिक सोयी असलेल्या नव्या घरात राहता येईल. इथले अरुंद रस्ते मोठे होतील. या परिसराची कनेक्टिव्हिटी बदलून जाईल. या परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये, यासाठी एक उड्डाणपूल बांधण्याची योजना आहे. त्यामुळे मुंबईच्या टोकाकडून येणारी वाहने थेट जेजे रुग्णालयाजवळ उतरतील.

## बंगालनंतर आता हैदराबादमध्ये बाबरी स्मारक उभारण्याची घोषणा

■ हैदराबाद

**पश्चिम** बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचे निलंबित आमदार हुमायूं कबीर यांनी मुर्शिदाबाद येथे बाबरीसारख्या मशिदीची पायाभरणी केली. त्यानंतर आता ग्रेटर हैदराबादमध्ये बाबरी मशीद स्मारक आणि वेल्फेअर इन्स्टिट्यूशन उभारण्याची घोषणा तहरीक मुस्लीम शब्बनने केली आहे. बाबरी मशीद पाडल्याच्या ३३व्या वर्षपूर्तीच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या



या निर्णयाची माहिती संस्थेचे अध्यक्ष मुश्ताक मलिक यांनी पत्रकार परिषदेत दिली. स्मारक कसे आणि किती वेळेत उभारले जाणार याचा तपशील लवकरच जाहीर केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

मुश्ताक मलिक यांनी या प्रकल्पाशी संबंधित वादांवर बोलताना इतिहास आणि धर्माच्या नावावर निर्माण झालेल्या राजकीय वातावरणावर टीका केली. ते म्हणाले की, बाबरच्या नावामुळे कोणालाही त्रास होऊ नये. परंतु या विषयाचा राजकीय प्रचारासाठी सातत्याने वापर केला जात आहे. देशात विभाजनाची भावना वाढवण्यासाठी आणि हिंदू, मुस्लीम, शीख, ख्रिश्चन व दलित यांच्यातील बंधुत्वाला तडा देण्यासाठी मुद्दाम हा विषय वाढवला जात आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## तुळशीदास रामायणात मंदिराचा उल्लेख नाही

इतिहासाचा दाखला देत ते म्हणाले की, तुळशीदासांचे रामायण बाबरी मशीद बांधल्यानंतर सुमारे ६० वर्षांनी लिहिली गेली असून, त्यामध्ये राम मंदिर पाडल्याचा कुठेच उल्लेख नाही. बाबरीनंतर हुमायूं आणि त्यानंतर अकबराचे राज्य आले. अकबराच्या दरबारात विधी, प्रार्थना आणि हवन होत असत, जोधाबाई महालात वास्तव्य करत होत्या आणि त्या काळात तुलसीदास जिवंत होते. अकबर आणि मानसिंह यांच्याशी तुलसीदासांचा संपर्क असताना देखील त्यांनी मंदिर पाडल्याचा उल्लेख केला नाही, यावरून हा मुद्दा राजकीय हेतूने पुढे रेटला आहे.

## कुनोतील चित्त्याचा रस्ते अपघातात मृत्यू

■ भोपाळ

मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील (शिवपुरी लिंक रोड) घाटीगाव-सिमरिया वळणाजवळ कुनोतील दोन पळून गेलेल्या चित्त्यांपैकी एका चित्त्याचा रस्ते अपघातात मृत्यू झाला. अज्ञात वाहनाने चित्त्याला धडक दिली. ज्यामुळे तो महामार्गाच्या कडेला पडून जागेवरच मृत्युमुखी पडला.

ही घटना आज सकाळी ६ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेची माहिती मिळताच घाटीगाव पोलीस आणि वन विभागाचे अधिकारी घटनास्थळावर पोहोचले. त्यांनी चित्त्याचा मृतदेह कुनो शवविच्छेदनासाठी पाठवला.

## स्मृती मंधाना-पलाश मुच्छलचे लग्न रद्द

■ मुंबई

**भारतीय** महिला क्रिकेटपटू स्मृती मंधाना आणि गायक पलाश मुच्छल यांचे मागील काही दिवसांपासून चर्चेत असलेले नियोजित लग्न रद्द करण्यात आले आहे. स्मृती मंधानाने लग्न रद्द झाल्याचे इंस्टाग्रामवर जाहीर केले. त्यानंतर काही मिनिटातच पलाश मुच्छलने इंस्टाग्रामवर स्टोरी टाकून मी वैयक्तिक आयुष्यात पुढे जाण्याचा निर्णय घेतल्याचे जाहीर केले. या इंस्टाग्राम स्टोरी २४ तासच इंस्टावर राहतात.

स्मृती मंधानाने इंस्टाग्रामवर लिहिले की, गेल्या काही आठवड्यांपासून माझ्या वैयक्तिक आयुष्याबद्दल खूप

**दोघांकडून घोषित**



चर्चा सुरू आहे. म्हणून मला वाटले की, आता बोलण्याची वेळ आली आहे. मी खूप खासगी व्यक्ती आहे. मी त्याबद्दल गोपनीयता राखू इच्छिते. परंतु लग्न आता रद्द केले आहे हे स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे. मला हे प्रकरण येथेच थांबवायचे आहे. मी सर्वांना विनंती करते की, हे प्रकरण आणखी वाढवू नका. दोन्ही कुटुंबांच्या वैयक्तिक जीवनाचा आदर करा आणि आम्हाला आमच्या आयुष्यात पुढे जाण्यासाठी वेळ द्या.

तर पलाश मुच्छलने इंस्टाग्रामवर लिहिले की, मी माझ्या वैयक्तिक आयुष्यात पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्यासाठी सर्वात पवित्र असलेल्या गोष्टींबाबत अशा गोष्टी घडताना पाहून खूप दुःख होते आहे. समाज म्हणून अज्ञात स्रोतांकडून आलेल्या बातम्या आणि चर्चांवरून त्वरित निष्कर्ष काढू नये. माझी टीम खोटी आणि बदनामीकारक माहिती पसरवणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करणार आहे.

## महापौर-नगरसेवक पदांचे लिलावच करा! शिंदेंच्या उमेदवाराची मागणी

■ सांगली

**राज्यात** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये युती-आघाडीची गणिते अजूनही जुळत नसताना, आता सत्ताधारी शिंदे गटातूनच आलेल्या एका अजब प्रस्तावाने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. निवडणुकांमध्ये होणारा कोट्यवधींचा खर्च, पैशांचा पाऊस आणि मतदारांमध्ये पैशांचे वाटप याचा संदर्भ देत, निवडणुका घेण्याऐवजी थेट महापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष आणि नगरसेवक या पदांचे जाहीर लिलावच करावेत, अशी मागणी शिंदे गटाचे पदाधिकारी वीर कुदळे यांनी केली आहे.

सांगलीतील आष्टा नगरपालिकेतील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार आणि वाळवा तालुका संघटक असलेल्या कुदळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, निवडणूक आयोग आणि राष्ट्रपती यांना थेट पत्र लिहून ही मागणी केली आहे. कुदळे म्हणाले की, निष्ठावंतांना दूर ठेवून पैसा आणि प्रभाव असलेल्यांनाच तिकीट व सत्ता मिळत असल्याने निवडणूक हा लोकशाहीचा सोहळाच उरलेला नाही. त्यामुळे असे नाटक करण्यापेक्षा सरळ लिलाव करून ज्याच्याकडे जास्त पैसा आहे त्याने पद विकत घ्यावे. ही प्रक्रिया राबविल्यास राजकारणापासून वंचित असलेल्या गुंड आणि गुन्हेगारांनाही अधिकृतपणे पदे मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.

## सक्षम ताटे हत्या प्रकरण कुटुंबाला ८ लाखांची मदत

■ नांदेड

**नांदेडमध्ये** आंतरजातीय प्रेमसंबंधाला असलेल्या विरोधातून २० वर्षीय सक्षम ताटे याची निर्घृण हत्या झाली. त्याची प्रेयसी आंचल मामीलवाडच्या कुटुंबातील सदस्यांनी ही हत्या केल्याचा आरोप आंचल हिने केला आहे. राज्यभरात या प्रकरणाने खळबळ उडाल्यानंतर राज्य शासनाने पीडित ताटे कुटुंबाला आर्थिक आणि शासकीय मदत जाहीर केली.

समाज कल्याण विभागाने ताटे कुटुंबासाठी एकूण ८ लाख २५ हजार रुपयांची मदत मंजूर केली आहे. त्यापैकी ४ लाख १२ हजार ५०० रुपयांचा पहिला हप्ता कुटुंबाच्या खात्यात जमा झाल्याची माहिती आहे. शिल्लक रक्कम न्यायालयात आरोपपत्र दाखल झाल्यावर देण्यात येणार आहे. त्याचबरोबर कुटुंबातील एका सदस्यासाठी शासकीय नोकरी निश्चित केली आहे. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करत ८ आरोपींना अटक केली आहे.

## एकसंध राहून काम करावे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे आदेश

■ मुंबई

**वांद्रे** आणि वरळीतील सेंट रेजिस येथील राड्यानंतर उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अखिल भारतीय कामगार सेनेच्या महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची मातोश्री येथे बैठक बोलावली. या बैठकीत त्यांनी भाजपाची मक्तेदारी मोडून कामगार सेनेने एकसंध राहावे, असे निर्देश दिले.

ठाकरे यांनी कामगार सेनेच्या अंतर्गत कारभारावर बोट ठेवले आणि कामगारांच्या हितासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायासाठी संघटनेने आपला आवाज अधिक जोरकस केला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. भारतीय कामगार सेना ही कुणाचीही वैयक्तिक जहागिरी नाही. त्यामुळे एकसंध राहून काम करा, असा सज्जड दमही त्यांनी भरला. यावेळी त्यांनी ज्येष्ठ नेत्यांना खडसावले. कामगार सेनेच्या युनिट राज्यभरातील हॉटेल, विमानतळ, कारखाने आणि कंपन्यांमध्ये कार्यरत असल्याचे सांगत कामगारांच्या भल्यासाठी आवाज उठवण्याचेही आवाहन केले.



नाताळ सणाची जोरदार लगबग सुरू झाली आहे. मुंबईतील ताज प्रेसिडेंट हॉटेलमध्ये सांताक्लॉजचा देखावा साकारण्यात आला आहे. (छाया -दीपक साळवी)

## सैन्यात दाखल होण्यास सक्तीला जर्मनीत विरोध! तरुणांचे आंदोलन




■ बर्लिन

**जर्मनीत** लष्करी सेवा सक्तीची करण्याच्या सरकारी हालचाली विरोधात देशभरात तरुणांचा उद्रेक उसळला आहे. चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांनी लष्करी सेवा सक्तीची करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यासाठी १८ वर्षांच्या तरुणांनी एक प्रश्नावली भरून सरकारला द्यायची आहे.

या विरोधात बर्लिनसह ९० शहरांमध्ये शेकडो शाळा आणि महाविद्यालयांतील विद्यार्थी रस्त्यावर उतरले. जर्मनीने २०११ मध्ये सक्तीची लष्करी सेवा रद्द केली होती.

जर्मन संसदेने लष्करी भरती व्यापक करण्यासाठी आणि सैनिकांची संख्या कमी पडल्यास सैन्य भरती पुन्हा सक्रिय करण्यासाठी लष्करी सेवा कायद्यात बदल केला आहे. या निर्णयानुसार जानेवारी २०२६ पासून सर्व १८ वर्षांच्या पुरुषांना एक प्रश्नावली पाठवली जाईल. त्यात त्यांना लष्करात सामील होण्याची इच्छा आहे का हे विचारले जाईल. महिलांसाठी हा फॉर्म ऐच्छिक असेल. त्यानंतर २०२७ पासून सर्व पुरुषांना वैद्यकीय तपासणी करावी लागेल.

## शालेय सहलींसाठी फक्त लालपरी खासगी बस वापरल्यास कारवाई

■ पुणे

**राज्यातील** शाळांच्या सहलींसाठी आता खासगी बस किंवा शाळेच्या स्वतःच्या स्कूलबसऐवजी फक्त सरकारी एसटी बस लालपरी वापरणे बंधनकारक केले आहे. शिक्षण विभागाचे नियम पाळले जात नसल्याने आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत असल्याने हा निर्णय घेतला आहे. सहाय्यक परिवहन आयुक्त विजय तिराणकर यांनी सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक अधिकाऱ्यांना खासगी बस वापरणाऱ्या शाळांवर कारवाईचे आदेश दिले आहेत.

याशिवाय आतापर्यंत वॉटर पार्क, रिसॉर्ट, बाग-बगिचे अशा ठिकाणी शाळा आपल्या सहली घेऊन जात होत्या. मात्र शिक्षण विभागाने त्यांना ऐतिहासिक स्थळांना सहली घेऊन जाण्याचे आदेश दिले आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना इतिहास, भूगोल, संस्कृतीची झलक पाहायला मिळेल.